# प्रणयवती, मी प्रणयवती

अं. सं. ठाणे
REFBK-0009503



२२२८०
नामांक ... ८८० ...

# भाग्यवती, मी भाग्यवती

सुप्रसिद्ध स्वरकोकिलेची सुरेल आत्मकथा

९५०३

अनुवादक :
विजय तेंडुलकर

नव-लेखन : क्रमांक सहा

REFBK-0009503


किंमत दीड रुपया

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22290 वि. .... चरित्र
क्रमांक ..७९४ नों: दि: ....२९-९-५७

प्रकाशक :
वसंतकुमार सराफ
' नव-लेखन '
ई ९, मॉडेल हाऊस,
प्रॉक्टर रोड, मुंबई ४.

मुद्रक :
के. एल. एन. राव,
मुंबई वैभव प्रेस,
वल्लभभाई पटेल रोड,
मुंबई ४.

प्रकाशन-काल : ऑगस्ट १९५७



**नायिका आणि लेखिका : मारिअन अँडर्सन**

....लोकविलक्षण उलथापालथींचे योग तिच्या कुंडलींत नव्हते आणि या आत्मकथेंतही आढळणार नाहींत. तिच्या साऱ्या जीवनांत एक प्रकारचा लोभस आणि नितळ संथपणा आहे. तरीहि निश्चित आणि सतत ओघ आहे. कांहीं सुंदर तशीं कांहीं खडतर वळणें आहेत. एकाद दुसरा भोंवराही....

या आधींचीं पांच....

- **शिखरावरून**
  जगप्रसिद्ध उद्योगपतीची आत्मकहाणी.

- **दयेची देवता**
  अमेरिकन रेड क्रॉसच्या संस्थापिकेची चरित्र-कथा.

- **नवें घर : नवें आयुष्य**
  ओसाड भागांत जीवन फुलविलेल्या कुटुंबाची गोष्ट.

- **झेंप**
  हंगेरियन नर्तक–युगुलाची आत्मकहाणी.

- **आशा–गीत**
  अमेरिकेंतल्या श्रेष्ठ हॉटेल-मालकाचें आत्मकथन.

या प्रत्येक पुस्तकाची किंमत : रुपये दोन.

… स्थळप्रत.
…ालय ठाणे
…
e403

# मायेच्या सावलींत

आईबाबांच्या सावलींतलं—फिलाडेल्फिआंतलं माझं बालपण फार सुखाचं गेलं. निदान बाबा असेपर्यंतच्या साऱ्या स्मृति सुखाच्याच आहेत. म्हणजे आम्ही श्रीमंत होतों असं नव्हे. हव्याशा वाटणाऱ्या अनेक गोष्टी आमच्या इथें नव्हत्या. पण त्यांचं आम्हांला कधीं मोठंसं वाटलं नाहीं; कारण खरोखर आवश्यक तें सर्व आमच्या घरकुलांत होतं, नांदत होतं.

बाबांची आठवण अगदीं ताजी आहे. त्यांचं एकादं छायाचित्र आज माझ्याकडे नाहीं; पण मनांत मूर्ति कोरलेली आहे. उंच, बांधेसूद, रुबाबदार आणि उमदी. जॉन ॲण्डर्सन त्यांचं नांव.

आमच्या पालनपोषणासाठीं बाबा काय काय कामं करीत तें सारं मला सांगता येणार नाहीं. तें कधीं मला कळलंच नाहीं. लहान पोर, त्यांतून मुलगी, म्हणून त्या गोष्टीशीं माझा कधीं संबंधच आला नाहीं. एक आठवतं कीं अनेक वर्षं ते रीडिंग टर्मिनल मार्केटमध्यें रेफ्रिजरेटर रूममध्यें कामाला होते. कधीं कधीं—पण नियमितपणें नव्हे—ते कामावरून येतांना बरोबर माझ्यासाठीं एक सोनेरी वर्खाचा मोठा केक घेऊन येत; आणि मग मला जेवणखाण सुचत नसे. त्या केकनेंच पोट भरत असे. ते कोळसा आणि बर्फ विकण्याचं कामही करीत होते असं ऐकते. आणखीही कांहीं रोजगार त्यांनीं केले असावेत. एक खरं कीं ते जिवापाड खपून आमच्या कुटुंबाची काळजी वहात; मन लावून सर्वांचं हवं नको पहात.

माझी आई व्हर्जिनिआंतल्या लिंचबर्गला लग्नाआधीं शाळामास्तरीण होती. फिलाडेल्फिआंत तिला मास्तरणीची जागा मिळाली असती कीं नसती तें कुणास ठाऊक. एकादी नोकरी मिळालीही असती ; पण

बाबा असेपर्यंत तिनं ती केली मात्र नाहीं. तिनं प्रयत्नहि केला नाहीं. तिचं आपलं घर आणि मुलंबाळं एवढंच जग होतं. त्यांतच तिचं शरीर आणि मन चोवीस तास गुंतलेलं असे.

आमच्या फिलाडेल्फिआच्याच दक्षिण भागांत माझी आजी, बाबांची आई, रहात होती. अंगानें उंच रुंद. खऱ्या अर्थानें घराची मालकीण, कुटुंबाची कारभारीण. आम्ही तिच्याकडे कांहीं काळ रहायला होतों तेव्हां त्या घरांतलं तिचं अबाधित वर्चस्व मी पाहिलेलं आहे.

आमचं घर वेब्स्टर स्ट्रीटवर होतं. तिथं मी २७ फेब्रुवारीला जन्मले. साल कोणतं तें सांगण्यांत तसं मोठंसं औचित्य आतां उरलेलं नाहीं. मी दोन वर्षांची असतांना आम्ही आजीकडे प्रथम रहायला गेलों. आजीचं घर प्रशस्त होतं. जागा भरपूर होती. आम्ही नवीन गेलेलीं माणसं तीन. आई, बाबा आणि मी. तिसऱ्या मजल्यावर आमची सोय केली होती. आईला नवीन बाळ या खोलींतच झालं. डॉक्टर आले तेव्हां मी पलंगाखालीं लपले होते. तिथंच मला झोंप लागली. मी जागी झाले ती एका किंकाळीनें. बाळाची किंकाळी. नंतर कळलं कीं मला बहीण झाली होती. पुढें बरेंच दिवस माझी अशी प्रामाणिक समजूत होती कीं मला बहीण झाली म्हणजे डॉक्टरांनीं तिला त्यांच्या कातडी, काळ्या बॅगेतून आणली. खरं काय तें कळलं तेव्हां हंसूं आलं. माझी ही बहीण ‘अलाइस.’

कुटुंब वाढत चाललं तशी जागा अपुरी पडूं लागली. पुन्हां आम्ही जागा बदलली. कोलोरॅडो स्ट्रीटवर आम्ही स्वतंत्र घर भाड्यानं घेतलं. आजीच्या घरापासून तें जवळच होतं. घर तसं छोटं होतं; पण आमच्या गरजेला पुरेसं होतं. त्यांत बाथरूम नव्हती. दर दिवशीं आई आम्हां मुलांना फक्त स्वच्छ धुवून पुसून काढी. शनिवारीं स्वयंपाकघराच्या मधोमध लाकडाचं एक मोठं टब पाण्यानं भरून घेऊन साग्रसंगीत अंघोळीचा कार्यक्रम होत असे.

घरकामांतच आईचा बहुतेक दिवस जाई. मी वडील मुलगी; म्हणून आईला मदत करायला मला लौकरच मुभा मिळूं लागली. लहानसहान

कामांत मी आईला हातभार लावी. पण खरं म्हणजे माझा बराच वेळ टेबलाशीं नाहींतर पाटावर बसून हातापायांनीं ताल धरून मोठमोठ्यानें गाण्यांत जाई. गाणं तशी त्याची चालही माझ्या बनावटीची असल्यानें बाकी कुणाला त्यांत रस वाटत नसे. तें कळतही नसेल. आतां कदाचित् कुणी, माझ्या संगीत-व्यासंगाची ती सुरुवात म्हणतील. तसा ताल धरून जोरजोरानें गळा काढण्यांत मला मौज वाटे एवढं मात्र खरं.

वर्षांतून एकदां आम्ही 'बार्नम अँड बेले' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या सर्कसला जात असूं. आम्हां मुलांना, आईला, ती सहलच वाटे. घरापासून कुठेंतरी लांब जायला मिळत असे. खूप आधींपासून आमची यासाठीं पूर्वतयारी चाले. ख्रिसमसनंतर हा आमचा दुसरा सणच असे, म्हणानात. बाबा यानिमित्त आम्हांला नवे कपडेसुद्धां शिवून घेत. खाण्यापिण्याचे जिन्नस बरोबर घेऊन आम्ही 'ट्रॉली कार' मधून थाटानें निघत असूं.

ईस्टर हा असाच आणखी एक मोठा सोहळा. यानिमित्तही आम्हांला नव्या वस्तू घेतल्या जात. स्वतः बाबा त्यांत लक्ष घालीत.

सहावं वर्ष लागण्याआधींपासूनच मी आईबाबांबरोबर रविवारची चर्चला जाऊं लागले. सहावा वाढदिवस झाला आणि चर्चच्या बालचमूंत माझं नांव दाखल करून घेण्यांत आलं. रविवार कधीं एकदांचा येतो असं मग मला होऊन जाई. इतर मुलामुलींच्या ओळखी इथं झाल्या. यांतली एक मुलगी व्हायोला जॉन्सन. ही आमच्या समोरच सडकेपलिकडे राही. मला ती फार आवडे. आमची मैत्रीच जमली. आणि पुढें वर्षा दोन वर्षांनीं आम्ही दोघी एकत्र गाऊं लागलों.

चर्चमधल्या आमच्या गाणाऱ्या बालचमूचे प्रमुख होते अलेक्झँडर रॉबिन्सन. व्हायोलाला आणि मला त्यांनीं एका रविवारी बायबलमधल्या एका स्तोत्राची प्रत पाठ करायला दिली. चाल समजावून सांगितली. तें स्तोत्र होतं, "Dear to the heart of the Shepherd." आम्ही दोघींनीं मिळून तें म्हणायचं होतं. आम्ही खूप सराव केला. आणि ठरल्या रविवारीं सकाळीं गायलों. जाहीर रीत्या मी ती प्रथम तिथं गायले.

ऐकायला आई नव्हती. एक तर तो कांहीं मोठासा अलौकिक प्रसंग नव्हता. शिवाय आधींच दोन अलौकिक प्रसंग घरीं तिच्यापुढें वाढलेले होते. माझ्या दोघी छोट्या बहिणी. चर्चमधून घरीं जातांना, बाबा त्यांच्या आईकडे मला घेऊन चढले. आणि तिथं थोडा वेळ मोडला. आम्ही घरीं पोंचलों तेव्हां अलेक्झँडर रॉबिन्सन येऊन, आईला भेटून गेल्याचं कळलं. त्यांनीं निरोप ठेवला होता, मी आणि व्हायोलानें त्या स्तोत्राच्या जास्त तालमी कराव्यात. चर्चमधल्या खुल्या प्रवचनाच्या वेळीं ते आम्हांला तें स्तोत्र आतां म्हणायला सांगणार होते. हें ऐकून बाबा साभिमान म्हणाल्याचं स्मरतं, "माझ्या पोरीला उगींच जिवापलिकडे गायला लावायला लागले तर म्हणावं चालणार नाहीं."

या उद्गारांनीं क्षणभर कसं मोठं झाल्यासारखं वाटलं. आपण कुणीतरी आहोंत असं वाटलं. त्याच वेळीं बाबा मला विचारते तर मी म्हटलं असतं, "मला गाणं आवडतं." मला गाणं आवडे, हें तर खरंच होतं.

माझे आईबाबा तसे गाणारे नव्हते. पण पावसाळी दिवसांत आम्ही घरांत डांबून पडलों कीं सारीं मिळून गाण्यांच्या भेंड्या लावीत असूं. आठवत तीं सारीं जुनीं अमेरिकन गाणीं, स्तोत्रं आणि भक्तिगीतं आम्ही गळ्यावर म्हणत असूं.

शाळेकडे आम्हां मुलांचं दुर्लक्ष होत नाहीं याबाबत आई अतिशय दक्ष असे. तिची नजर आणि वाणी मार्मिक होती. गृहपाठाबद्दल ती म्हणे, 'हुशारी कांहीं सगळ्यांना सारखी नसते. कुणाचा पंधराच मिनिटांत होईल तो अभ्यास करायला तुम्हांला अर्धा तास लागेल. लागूं दे. अर्ध्या तासांत तो आपण व्यवस्थित करावा म्हणजे झालं.' तिचा हा उपदेश किती मौलिक होता तें मला कळायला बराच काळ जावा लागला.

एक दिवशीं बाबांनीं आमच्यासाठीं पिआनो आणला. तो घरीं आला तेव्हांचा केवढा आमचा आनंद, केवढा उत्साह! एकाच बोटानें त्या दिवशीं मी त्यावर छोट्या छोट्या सुरावटी वाजवूं लागले. त्यावेळीं कल्पनाही नव्हती कीं पुढें तो मला चांगल्या प्रकारें आणि सफाईनें वाजवता येईल. एक दिवशीं आईनें पोंचवायला दिलेले कुणाचे धुवट कपडे घेऊन

मी सडकेनें जात होते आणि पिआनोचा परिचित ध्वनि ऐकला. तो जिथून आला त्या खिडकींत डोकावले तों आंत एक बाई पिआनोशीं बसून त्यावर सुरांच्या गोड लहरी काढीत होती. तिची कातडी माझ्या-सारखी काळी होती. ती नीग्रो होती. त्या क्षणीं मनांत खटका पडला. पटलं कीं, प्रयत्न केला तर मला हें अशक्य नाहीं.

या काळांत चर्चमधलं गायन चालूच होतं. रॉबिन्सन मला अधिका-धिक संधि देत होते. मला जास्त जास्त आत्मविश्वास येत होता.

माझी आत्या युनिथन बॅप्टिस्ट चर्चच्या मोठ्या माणसांच्या गायन चमूंत होती. जात्या चटपटीत आणि धांवपळी असल्यानें इतर चर्चेस-मधल्या गायनचमूंतही ती लक्ष घाली. तिच्या परिचयाचे कुणी मिस्टर न्युब्री म्हणून होते. त्यांचा त्यांच्या दुकानीं एक चर्च चालू करण्याचा बऱ्याच दिवसांपासून प्रयत्न चालला होता. त्यांची तळमळ पाहून आत्याला त्यांना मदत करावीशी वाटली आणि या नवीन चर्चमधल्या गायनचमूंत मी गावं असं तिनं मला सांगितलं.

एक दिवशीं आईनें सांगितलेलं कांहीं विकत आणण्यासाठीं मी बाजारांत चालले होते. आणि रस्त्यांत एक जाहिरात पडलेली दिसली. लांबूनच तिनें माझं लक्ष वेधून घेतलं. उचलून पाहिली तों नव्या चर्चची जाहिरात. कोपऱ्यांत माझा फोटो आणि त्याखालीं माझं नांव छापलं होतं. ‘Come and hear the baby contralto, ten year old’ असं पुढें मोठ्या अक्षरांत म्हटलं होतं. त्या जाहिरातीनं मी इतकी महिरून गेले कीं वास्तविक मला दहावं नव्हे, बारावं वर्ष सरलं होतं हें तात्पुरतं लक्षांतच आलं नाहीं. आतां त्या नव्या चर्चमधल्या माझ्या गायनाची आठवण मला नाहीं. पण ती जाहिरात पक्की आठवते.

त्या सालीं कांहीं दुःखद घटना घडायच्या होत्या. कामावर असतां बाबांच्या डोक्यांत चुकून कांहींतरी पडून ते बिछान्याला खिळले. त्यांना ‘ट्युमर’ झालं होतं हें डॉक्टरांच्या उशीरा लक्षांत आलं. ऐन क्रिसमस जवळ येत असतां बाबा असे रुग्णशय्येवर असहाय्य पडले होते आणि आईवर प्रपंचाची सर्वच जबाबदारी ओढवली होती.

● ●

## बाबांचं निधन

कांहीं कालानें बाबा निवर्तले. आम्ही मुली पोरक्या झालों. तसं कधीं आम्ही शब्दांनीं म्हटलं नाहीं; तरी पण आयुष्याचं वळण आतां बदलणार हें स्पष्टच होतं.

बाबांचे नंतरचे सोपस्कार संपतांच आत्यानें आम्हांला पुन्हा एकवार आमच्या आजोळीं नेलं. आजीचं वर्णन मागें केलंच आहे. आपल्या रक्तांत रेड इंडियन अंश आहे याचा तिला मोठा अभिमान होता. आजोबा फार प्रेमळ होते. आम्हांला त्यांनीं तात्काळ जीव लावला. त्यांच्यापुरतं धर्मकर्माला ते फार महत्त्व देत. आत्यासारखे ते बॅप्टिस्ट चर्चचे भक्त नव्हते. ते शनिवारीं ' सब्बाथ ' पाळीत आणि स्वतःला ' ब्लक ज्यू ' म्हणवून घेत.

इथलं सारंच वळण वेगळं होतं आईला इथं वेगळं असं कांहींच महत्त्व नव्हतं. ती फक्त कष्टांत वांटेकरी होती. बाकी ' आजी म्हणे तो कायदा ' मानला जाई. त्याखालोखाल आत्याचं महत्त्व. आजीनें हांक मारली कीं घरांत धांवपळ आणि लगबग उडत असे; इतका आजीचा बोज होता. तिला मुलं हवींशीं वाटत. घरांत नेहमीं पोरवडा असे. मुलांच्या आया बाहेर कामं करून पैसे आणून देत; आणि आजी मुलांकडे पाही.

आई आमच्यासाठीं बरेच कष्ट करी. ते नेमके किती हें कळायला तेव्हां मार्ग नव्हता. आज त्याची कल्पना करता येत नाहीं. दिवसा ती बाहेर कामाला जाई. येतांना कुणाकुणाचे धुणावळीचे कपडे घेऊन येई. ते धुत-ल्यावर घरोघर पोंचविण्यांचं काम कांहीं वेळां आम्हां बहिणींना करावं लागे.

तिला पूर्वीचा मास्तरकीचा अनुभव असला तरी फिलाडेल्फिआंत तशी संधि मिळणं तेंव्हां तरी कठीण होतं. म्हणून मिळेल तो रोजगार ती करीत होती. पुनर्विवाहाच्या कांहीं संध्या तिला आल्या होत्या; तिनें त्या अव्हेरल्या. पटत नाहीं तें गरजेपोटीं करणं तिला कधींहि मंजूर नसे. तशी ती मोठी नेकीची बाई होती. आमचे कुणी कुणी आप्त परिचित म्हणत, "मारिअन आतां मोठी झाली. तिला रोजगाराला लावा." परंतु आईनें हें कधींही केलं नाहीं. ती सारं ऐकून घेई आणि किंचित् हंसे, इतकंच.

रोजगार करावा इतकी मी खरीच मोठी असते तरी आईनें मला रोजगाराला लावलं नसतं, हें आतां समजतं. तिची शिक्षणावर श्रद्धा होती. मी प्राथमिक शिक्षण संपवलं आणि तिच्या मूक प्रोत्साहनानें दुय्यम शाळेंत गेले. प्रथम विल्यम पेन हायस्कुलांत नांव घातलं. व्यापार-उदीमाचा अभ्यासक्रम घ्यावा असा बेत होता. परंतु मग साउथ फिलाडेल्फिया हायस्कुलांत मी दाखल झाले. तिथल्या प्रिन्सिपल डॉ. ल्युसी विल्सन यांनीं माझ्या बाबतींत जातीनेंच लक्ष घातलं.

• •

# मनोरे

गाण्याचा व्यासंग झाला नसता तर मी डॉक्टरीण झाले असते. निदान माझीं स्वप्नं तरी डॉक्टरकीचीं होती. गाण्यांत विरस झाला, औदासीन्य आलं कीं मी एकटीच बसून हीं डॉक्टरकीचीं स्वप्नं पहात असे. माणसांचीं शारीरिक व्यंगं दुरुस्त करावींत हा माझा अशा स्वप्नरंजनांतला मोठा ध्यास होता.

एकदां माझ्या मनांत नर्तनाचे विचारही बरेच घोळले होते. रात्र रात्र त्या स्थितींत मी मनांतल्या मनांत लयबद्ध, मुलायम हालचाली करीत नाचत, तरंगत राही. प्रत्यक्षांत मी नृत्याला लागतात ते चढावही विकत आणले. पण मग लौकरच उत्साह ओसरला. हा आपला प्रांत नव्हे एवढं उमगलं. तरीहि रंगमंचाविषयींची, निःस्तब्ध श्रोतृसमुदायाविषयींची, टाळ्या आणि प्रशंसोद्गारांविषयींची ओढ कायम राहिली, वाढलीच.

आमच्या रेव्हरंड पार्कर्सना संगीताची फार आवड. वर्षांतून एकदां तरी ते युनियन बॅप्टिस्ट चर्चमध्यें संगीताचा एक कार्यक्रम घडवून आणीत. या कार्यक्रमासाठीं बहुधा रोलँड हेज या प्रसिद्ध 'टेनॉर' गायकाला बोलावण्यांत येई. मी त्याची भक्त बनले. त्याच्या आवाजांत एक अशी विलक्षण माधुरी होती कीं संगीताचा गंध नसले-ल्यानेंही त्याच्या गाण्यावर मोहित व्हावं. परंतु मग अशी कुरकुर होऊं लागली कीं हा प्रसिद्ध असेल; चांगला गातहि असेल. पण आमची मारिअन गाते तें आम्हांला समजतं तसं त्याचं समजत नाहीं. तिला गायला कां लावूं नये? आणि, याचा परिणाम म्हणून कीं काय, या कार्य-क्रमांत दोन तीन गीतांपुरता माझा अंतर्भाव होऊं लागला.

रोलँड हेजनेंही माझ्याविषयीं अत्यंत सौजन्य आणि अगत्य दाखवलं. एकदां तो घरीं आजीकडे आला आणि म्हणाला, "मारिअन चांगली गाते. तिला गाण्याचं व्यवस्थित शिक्षण घेऊं द्या." आजीला हें पटलं नाहीं. मारिअन गाते तर मग पदरचे पैसे खर्चून आणखी शिक्षण कशाला, हा तिचा दृष्टिकोन. बरीच चर्चा होत राहिली. आजीला विरोध करणं माझ्या आईला शक्य नव्हतं. कुणालाच तें शक्य नव्हतं.

अखेर चर्चच्या लोकांनींच पुढाकार घेऊन माझ्या संगीत-शिक्षणा-साठीं एका रविवारी निधि जमवला. धार्मिक निधीव्यतिरिक्त हा आणखी जादा निधी; परंतु सर्वांनीं कांहीं ना कांहीं देणगी दिली. १७ डॉलर आणि वर कांहीं रक्कम जमल्याचं स्मरतं. हा निधि मग आईच्या स्वाधीन करण्यांत आला. चर्चच्या लोकांचं हें अगत्य पाहून मला त्या दिवशीं काय आणि किती वाटलं तें शब्दांत व्यक्त करणं शक्य नाहीं.

तेवढ्यांत 'फिलाडेल्फिआ कोरल सोसायटीं'त दाखल होण्याची संधि मिळाली आणि माझा संगीत व्यासंग पुढें सरकला. या सोसायटीचे आम्ही सारे सदस्य हौसेनें गाणारे होतों, गानप्रेमी होतों. (सारे नीग्रोही होतों.) कांहीं वर्षांनीं पुढें मी एका संगीत–शिक्षिकेकडे शिक्षणासाठीं जाऊं लागले तेव्हां या सोसायटीच्या सदस्यांनीं आपापसांत निधि जमवून मला बरीच आर्थिक मदत केली.

एकदां या सोसायटीचे अधिकारी मिस्टर यंग घरीं आले असतां एकाद्या द्रष्ट्याच्या सुरांत आजीला म्हणाले, "मिसेस अँडर्सन, मी आतांच भविष्य करून ठेवतों, तें लिहून ठेवा. एक ना एक दिवस ही तुमची छोटी नात गायिका म्हणून एका रात्रीला पन्नास पन्नास डॉलर्स मिळवूं लागेल." पुढं त्यांचं हें भविष्य खरं ठरलं हें आतां वेगळं सांगायला नको. सर्वांनाच तेव्हां मि. यंग यांची फार आठवण झाली.

माझी आतांपर्यंतची प्रगति पाहिली तर ती लांब उड्यांची नाहीं. त्वरेनें झालेली नाहीं. तिचा वेग संथ होता. माझ्या स्नेहीपरिचितांच्या पाठबळानें हळू हळू मला जवळपासच्या गांवांतून गाण्याचे कार्यक्रम मिळूं लागले, त्याबद्दल माफक बिदागीही मिळूं लागली. विशेषत: रोलँड हेज यांनीं मला

अशा स्वरूपांत फार उत्तेजन दिलं. कुठेंही ते संगीताच्या कार्यक्रमासाठीं माझी शिफारस करीत आणि मला नवा कार्यक्रम मिळे. नीग्रो कॉलेजं, चर्चेस, इथं माझे वारंवार कार्यक्रम होऊं लागले. यामुळें छोटे छोटे प्रवास घडत. दिवस फिरतींत जात. आणि मग शाळा बुडे. शाळेंत मी पुन्हा जाई ती दबूनच. अशा भीतीनें कीं, मागे पडलेला अभ्यास भरून निघून मी सुधी पास होते कीं नाहीं, कोण जाणे.

येथवर मी आपली मनःपूर्वक गाई. याला शास्त्राचे बंध फारसे नसत. शास्त्राची जाण हवी हें हळूं हळूं यांतच माझ्या मनांत आपसूक येऊं लागलं. निव्वळ अंतःकरण ओतलं कीं परिणामकारक गाता येत नाहीं हें पटूं लागलं.

माझ्या पहिल्या गायनशिक्षिकेची आणि माझी गांठ पडली ती आगच्या घरच्या परिचयाच्या जॉन थॉमस बटलर यांच्यामुळें. तिचं नांवः मेरी सॉण्डर्स पॅटर्सन. ती नीग्रो होती. तिचा आवाज ' सोप्रॅनो ' जातीचा आणि आकर्षक होता. तिनें मोठ्या शहरांत राहून संगीताचा व्यासंगही बराच केला होता. आपल्याला येतं तें सारं मला शिकवण्याला ती आनंदानं तयार झाली. तेंहि विनामूल्य !

कांहीं महिने मग मी तिच्याकडे शिकत होते. संगीतांतले कांहीं महत्त्वाचे प्राथमिक गुरुमंत्र मला तिनें दिले. तिनें माझा शुबर्टच्या अजोड संगीताशीं प्रथम परिचय करून दिला. आणि तिनेंच मला खरोखरीचा ' ईव्हिनिंग गाउन ' कसा असतो तें प्रथम दाखवलं. असा एक ' गाउन ' मला तिनें दिला.

● ●

22210 दि.
नों: दि:

# मी काळी !

पद्धतशीर शास्त्रोक्त संगीताच्या अभ्यासाची जरूर मला भासूं लागतांच, त्या प्रकारच्या एखाद्या शिक्षणसंस्थेंत दाखल होता आलं तर पहावं असा विचार माझ्या मनांत आला. माझ्याबाबत आपुलकी असलेल्या एका गृहस्थांनीं अशा प्रकारच्या एका संगीत–शिक्षणसंस्थेचं नांवही सुचवलं.

आज ही संस्था अस्तिवांत नाहीं. त्यामुळें तिचं नांव सांगूनही उपयोग नाहीं. नवीन विद्यार्थी दाखल करून घेण्यांत येत असतां मी त्या संस्थेच्या कचेरींत गेले आणि उमेदवारांच्या रांगेंत नंबर लावला. कचेरींत एक तरुण मुलगी एका टेबलाशीं बसून उमेदवारांना अर्जांचे छापील फॉर्म्स देत होती आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तरंही पुरवीत होती. माझा नंबर येतांच तिनें माझ्याकडे लक्षही न देता माझ्यामागच्या उमेदवाराची दखल घेतली. त्यानंतर माझ्या मागचे रांकेंतले सारे उमेदवार संपेपर्यंत असं चाललं. त्यानंतर मी एकटीच उरले असं पाहून तिनं मला तुसड्या सुरांत पृच्छा केली, "तुम्हांला काय पाहिजे ?"

तिच्या तुसडेपणाकडं दुर्लक्ष करीत मी म्हटलं, "मला तुमच्या संस्थेंत नांव घालायचं आहे. त्याबद्दल चौकशी करायला आले."

माझ्याकडे निर्विकार चेहऱ्यानें पहात तिनें सांगितलं, "काळ्यांना आमच्याकडे प्रवेश नाहीं."

मी कांहीं बोलले नसावी. अशा तरुण मुलीच्या तोंडून असले शब्द ऐकायला मिळावेत याचं अतिशय आश्चर्य मात्र वाटलं. ती वयस्क असती, विटक्या, आंबट मुद्रेनें बसलेली दिसली असती, तर इतकं आश्चर्य

वाटलं नसतं. असं कां तें मला सांगता येत नाहीं. कदाचित् असं असेल कीं संगीतासारख्या स्वर्गीय आनंदाच्या परिसरांत ऐन उमेदींत वावरूनहि तिची वृत्ति अशी रहावी याबद्दलचं तें नवल असेल. मी तिला उलट कांहीं म्हटलं नाहीं. तिच्या वरिष्ठांना भेटण्याचा प्रयत्नहि केला नाहीं. मी वळले आणि त्या संस्थेच्या परिसराबाहेर पडले. जणूं कसला तरी थंडगार, गोठवणारा स्पर्श मला झाला होता आणि त्यानं सारी मी बधीर होऊन गेले होते.

अशा तऱ्हेचे शब्द ऐकण्याची माझी ही पहिलीच वेळ. हीच अखेर-चीही ठरली. माझी कातडी गोरी नसेल; पण भावना तर गोऱ्या माणसां-पेक्षां वेगळ्या नव्हत्या ! कांहीं दिवस रीतसर संगीत-शिक्षणाचा विचारच मी डोक्याबाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला. एका ठिकाणच्या अनुभवानें पोळलेलं मन इतरही संगीत शिक्षण संस्थांबाबत सावधगिरीचे, दूर रहाण्याचे इशारे देत होतं. ते ऐकून कांहीं वर्षं मी खरोखरच गप्प राहिले.

परंतु अनपेक्षिताचे आणखीही धक्के बसायचे होते. एका धक्क्यानें मनाची पूर्वतयारी झाली असली तरी प्रत्यक्ष प्रसंगांत वारंवार मन दुखावलं जातच होतं.

अजून मी हायस्कुलांत जात होते; आणि गाण्याच्या एका कार्यक्रमा-साठीं सॅव्हानाला जाणं आलं. पल्ला लांबचा होता. आई माझ्याबरोबर आली. वॉशिंग्टनला आम्हांला गाडी बदलावी लागली. नव्या गाडींत आम्हांला वेगळा डबा मिळाला. गलिच्छ डबा. अंतर्बाह्य घाणेरडा डबा. कारण आम्ही काळे होतों.

सॅव्हानाच्या मुक्कामांत एकसारखा तो डबाच मला आठवत होता. पुन्हा वॉशिंग्टनला परततांना तशाच डब्यांतून आम्ही प्रवास केला. या वेळीं तो नवीन नव्हता ; पण हृदयांतल्या वेदना पूर्वीइतक्याच तीव्र होत्या, लाज पहिल्याइतकीच मोठी होती. त्या प्रवासांत माझ्या रंगाच्या लोकांचं मी जवळून निरीक्षण केलं. कांहींना हें वेगळेपण मनोमन खटकत होतं. कांहीं तें अपरिहार्य म्हणून भरून चालले होते. चांगल्या गोष्टींचा सराव चांगला,

तसा वाईट गोष्टींचा सराव तितकाच वाईट. दुर्दैवानें या माझ्या बांधवांना वेगळेपणाचा, काळेपणाविषयींच्या तुच्छतेच्या दृष्टिकोनाचा सराव झाला होता. यांत बदल शक्य आहे, अपरिहार्य आहे, हें दोन्ही बाजूंना कधीं उमगणार होतं, कुणास ठाऊक. त्यानंतर या परिस्थितींत माझ्या हयातींतच मी कांहीं बदल अनुभवित आले आहे. अनेकजण हा बदल व्हावा, काळयागोऱ्या वर्णाच्या लोकांत बंधुत्वाचं वातावरण निर्माण व्हावं म्हणून कळकळीनें झटत असल्याचं मी पाहिलं आहे.

कांहीं वर्षांमागें व्हर्जिनिआंतल्या हॅम्टन गांवीं माझा कार्यक्रम होता. वादळ झालेलं होतं आणि वॉशिंग्टनपुढें रेल्वेच्या रस्त्याची बरीच नासधूस झाली होती. गाड्या वेळा उशीरां जात येत होत्या. एक सबंध रात्र त्यावेळीं आम्हांला वॉशिंग्टन स्टेशनांतच काढावी लागली. सकाळीं अखेर एक गाडी मिळाली आणि तिच्यांत उतारूंची खेंच गर्दी झाली. वेळ नेहमीची नव्हती. काळया लोकांची वेगळया डब्याची व्यवस्था यावेळीं पाळता येणं शक्य नव्हतं. सारे एकत्र, सरमिसळ खेटले. अशा त्या प्रसंगांत, एक गौरवर्णीय बाई, एका नीग्रो स्त्रीला थोडा वेळ उसंत मिळावी म्हणून तिच्या मुलाला स्वतःच्या मांडीवर घेऊन बसलेली मी पाहिली. नीग्रो आणि गोरे लोक खुल्या मनांनीं एकमेकांशीं बोलत होते. एकमेकांजवळचीं वर्तमानपत्रं एकमेकांना देत होते, जवळच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांची देवघेव करीत होते. आणि हें सारं सर्रास चालू असूनही कसला प्रलय ओढवला नव्हता.

आमच्या देशांत परिस्थिति बदलत आहे आणि म्हणून माझ्या-सारखीला उमेद आहे. तरीहि एक रुखरुख कायमची सलते आहे आणि सलत राहील.

कीं, तेव्हां मला गायनाच्या शाळेंत शिकायला मिळायला हवं होतं.

• •

# आवाजावर मेहनत

माझ्या पहिल्या संगीतशिक्षिकेनें, मेरी सॉण्डर्स पॅटर्सननें मला महत्त्वाचा धडा दिला तो हा कीं गातांना आवाज कुठल्या तरी विशिष्ट रोखानें टाकायला शिकावं. गाण्याच्या जागेच्या छपराशीं दोन भिंती मिळतात त्या दिशेनें पहात ती मला नेहमीं गायला लावी.

संगीतशिक्षिका बदलण्याचा मुद्दा उपस्थित केला तिनेंच. ॲग्नेस रेफस्नायडर या त्या वेळच्या आमच्या भागांतल्या सुप्रसिद्ध संगीतशिक्षिके-कडे मी जाऊं लागले.

मिस् रेफस्नायडरनीं माझ्या आवाजावर विशेष प्रकारची मेहनत घेतली. गळयाच्या कसरतींवर त्यांचा विश्वास नव्हता. श्वासो-च्छ्वासाच्या नियमनावर त्यांचा विशेष भर होता. ब्राह्म्स्च्या संगीताशीं माझा पहिला परिचय त्यांनीं करून दिला.

हायस्कूल सुटलं त्या सुमाराला माझा गुरू पुन्हा बदलला. गुसेप ब्रोघेटी हे माझे नवे संगीतशिक्षक. अनेक वर्षं तेच संगीतांतले माझे गुरू होते. मध्यें मध्यें त्यांच्याकडून धडे घेण्यांत खंड पडले ते सोडले तर त्यांचं निधन घडेपर्यंत ते माझे संगीतक्षेत्रांतले गुरू राहिले.

सार्वजनिक रीत्या गाणं म्हणजे काय तें मला त्यांच्यामुळें कळलं. सारी मेहनत, सारे धडे एकाच गोष्टीसाठीं : तुमचा आवाज हुकमी लागावा आणि तुमचं गाणं कोणत्याही परिस्थितींत यशस्वी व्हावं म्हणून. धंदेवाईक गायकाला किंवा गायिकेला 'आज माझी लहर लागत नाहीं' म्हणून कार्यक्रम रद्द करता येत नाहीं. वाटेल तेव्हां त्यानं गायलं पाहिजे. आणि तेंहि त्याचं नांव संभाळणारं गायलं पाहिजे. मग लहर नसेना का.

पॅटर्सन बाईकडे शिकत असतांना एक दिवशीं तिनं मला म्हटलं होतं, " मारिअन, गातांना तुझा साथीदार म्हणून कोण घ्यायचा तें आतां लौकरच तुला ठरवावं लागेल. " आणि मला विलक्षण महिरून आलं होतं. कायम साथीचा प्रश्न आला म्हणजे संगीतांत मी आतां बरीच प्रगति केली होती. पुढें कांहीं दिवसांनीं पुन्हां पॅटर्सनबाई म्हणाली, " तुला साथीला उत्कृष्ट माणूस म्हणजे बिली किंग. "

पुन्हां एकवार माझी वाचा अडली. संगीताच्या साथीच्या क्षेत्रांत बिली किंग म्हणजे माझ्या दृष्टीनें तरी अखेरचा शब्द होता. त्याची साथ मिळावी इतकं चांगलं मी गाते असंच पॅटर्सनना म्हणायचं होतं. याचा मला अभिमान वाटला. आणि तो कां वाटूं नये ? पण बिली किंग माझ्या साथीला यावा कसा ?

परन्तु अशक्य तें जमलं. पुढें बिली माझा मॅनेजरहि झाला. त्याची मदत मला फार झाली. त्याच्या नांवानें माझ्या गाण्याच्या जाहिरातीला एक वजन आलं. रोलँड हेजच्या तोडीच्या गायकांना त्यानं साथ केलेली. कार्यक्रमांपाठोपाठ कार्यक्रम चालून आले. माझी बिदागी वाढत गेली. फिलाडेल्फिआच्या अॅकेडेमी ऑफ म्युझिक मध्यें माझे कार्यक्रम होऊं लागले. व्याप वाढत होता.

गाता गाता मला आत्मविश्वास येत होता. वॉशिंग्टनमध्यें हॉवर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यमानें माझा कार्यक्रम झाला ; तिथें मला माझ्या विकसित गुणांची खरी जाणीव झाली. सरमिसळ श्रोतृवर्ग होता. रिचर्ड स्ट्रॉसचीं गीतं मी गात होतें. ' मॉर्गेन ' म्हणायला घेतलं. आणि गाता गाता त्या जुन्याच गीताला माझ्या गळयांत नवा अर्थ येऊं लागला. ' मॉर्गेन ' जणूं माझंच होतं आणि तिथं मी तें माझ्या अंतःकरणांतला त्याचा अर्थ उकलून म्हणत होते. मी स्वतःला जणूं विसरले होते आणि तरीही स्वतः होते. असे आत्मार्पण भावनेचे क्षण कलावंताच्या हयातींत क्वचित् येतात आणि येतात तेव्हां त्याला भारून टाकतात. तो क्षण तसा होता. ती वेळ तशी होती. श्रोतृवर्गांतले चेहरे मला अस्पष्ट, अंधुक दिसत होते—कुणी नवलानं ओथंबणारे, कुणी

किंचित् स्मित केलेले. गेल्या अनेक वर्षांच्या कष्टांचं फळ मला मिळतं आहे असं वाटलं.

आत्मविश्वासाचा हा क्षण फार महत्त्वाचा होता. यामुळें माझ्या संगीत–व्यासंगाला एक नवी गति मिळाली, अर्थ मिळाला. तपश्चर्या करीत राहिल्यास म्हणूं तें करून दाखवूं ही कलावंताला हवी ती जिद्द माझ्यांत स्फुरली.

उत्तरोत्तर मी माझ्या नीग्रो बांधवांपलिकडे गौरवर्णीय श्रोतृसमुदायांसमोरही गाऊं लागले. तसे प्रसंग वरचेवर येऊं लागले. माझ्याबद्दल त्या लोकांच्या नियतकालिकांतून प्रशंसेचे उद्‌गार छापून येऊं लागले. आणि एक दिवशीं संकल्प केला कीं न्युयॉर्कच्या टाउन हॉलमध्यें गाण्याचा कार्यक्रम करायचा.

दिवस, वेळ ठरली. खूप जाहिरात केली. त्या दिवशीं संध्याकाळीं तिकिट विक्री वेळेच्या बरीच आधीं सुरू करण्यांत आली होती आणि ती चांगल्या प्रकारें चालू होती असं मला सांगण्यांत आलं. कार्यक्रमाची वेळ येऊन ठेपतांच मी रंगमंचावर जाणार होते. त्या वेळेची प्रतीक्षा मी उताविळीनें करीत होते. अखेर नऊला मला माझ्या साथीदारासकट रंगमंचावर जाऊन कार्यक्रम सुरू करण्याला सांगण्यांत आलं. आम्ही गेलों. माझं ऊर गोठलं. प्रेक्षागृहांत तुरळकच श्रोते दिसत होते. तसा कार्यक्रमांचा अनुभव मला थोडका नव्हता; परंतु कोठल्याही परिस्थितींत गाण्याची आपली तयारी आहे हा मी स्वतःविषयीं करून घेतलेला ग्रह मात्र खरा नव्हता. केवळ विशीच्या वयाला मी या भ्रमांत रहाण्याचं कारण नव्हतं.

कसाबसा कार्यक्रम संपला. दुसऱ्या दिवशींचे अभिप्राय मोठेसे उत्साहवर्धक नव्हते. कुणी लिहिलं, “ बाईचा आवाज चांगला होता पण असकं तमकं कमी पडलं त्यामुळें रंग भरला नाहीं. ” आणखी कुणी म्हटलं, “ जिवावर घातल्यागत गायल्या. ”

लोकांना माझी जाहिरात आणि प्रत्यक्ष कार्यक्रम हा फसवणुकीचा मामला वाटूं नये अशी माझी तीव्र इच्छा होती. पण आतां करणार काय ? पुरती तयारी होण्याआधींच मी न्युयॉर्कमध्यें हात दाखवून

अवलक्षण करून घेतलं, या शरमेंत चूर होऊन मी पुन्हां फिलाडेल्फिआ गांठलं. मी बेचैन होतें. नको तें संगीत, असं झालं होतं. तें ऐकणंसुद्धां मरण वाटत होतं. धंदेवाईक गायिका होण्याचा बेत आतां पुरे, असं मन बजावीत होतं.

गैरसमज नका करून घेऊं. न्युयॉर्कमध्यें माझं जें स्वागत झालं त्याहून उजवं स्वागत अपेक्षावं अशी कुठल्याही प्रकारें माझी लायकी नव्हती. पण तरीहि बेसावध स्थितींत मी मार खाल्ला, याची जाणीव अपमानाच्या जाणीवेसारखी उरांत सलत होती. स्वत्व भंगलं होतं. आतां उरली होती फक्त संगीताविषयीं एक अढी. एक कडवट चव. एक उबग. आधीं आशा एवढी उंचावत गेली होती कीं ती भुईसपाट लोळतांना उपरेपणानं तें पहाणं मला शक्य झालं नाहीं. मी कितीहि अमान्य केलं तरी न्युयॉर्कचा टाउन हॉल हें अखेर अमेरिकन संगीत-क्षेत्रांतलं एक अत्यंत महत्त्वाचं स्थान होतं. तिथेंच मी माझी शोभा करून घेतली होती.

मी संगीत-शिक्षण सोडलं. मिस्टर बोघेटींकडे जाणं बंद केलं. क्वचितच मी गाऊं लागले आणि तेंही फारसं मनापासून नव्हे. झाल्या वाताहतीचे माझ्यावरचे परिणाम बोघेटींना जाणवले होते. त्यांनींही माझ्या अनुपस्थितीचा, अनियमितपणाचा, बेफिकिरपणाचा बाऊ केला नाहीं.

आईचं आणि माझं झाल्या प्रकाराबद्दल एकदां मोकळं बोलणं झालं. तेव्हां ती म्हणाली, “ हें बघ मारिअन, या जगांत कुठल्याहि बाबतींत सर्वांना समाधान देणं अशक्य आहे. मग आपला दाम कितीहि खण-खणीत असेना का. आपल्या हातांत इतकंच कीं जिवापाड खपून आपलं काम चोख करायचं. बस्स ! ”

औदासीन्याच्या, नाउमेदीच्या या काळांत एकच गोष्ट माझ्या मना-सारखी होती ; ती म्हणजे मी आमच्या हक्काच्या घरीं आई आणि बहिणींच्या सहवासांत होतें. मी हायस्कूल सोडलं तेव्हांच तें आम्ही

विकत घेतलं होतं. तसं म्हटलं तर आजीकडे आमचं तसं वाईट नव्हतं. पण किती झालं तरी आपलं घर तें आपलं घर.

रक्कम चुकवून घर घेतलं तेव्हांचा आनंद अवर्णनीय होता. तेव्हां घालून घेतलेली ती हार्डवुडची जमीन अजून चांगल्या स्थितींत आहे. आई सांगायची, " खरोखर स्वस्त वस्तू कुठली ! चांगली टिकते ती. "

• •

# आयुष्याचा जोडीदार

पोरवयांत माझ्या ओळखीपाळखीच्या मुलांचीं नांव लिहीत स्वप्नाळूपणें रमण्यांत मला रस वाटत असे असं आठवतं. त्यांतही एकाविषयीं मला विशेष वाटे असं स्मरतं. पण मग ' किंग ' माझ्या सहवासांत आला आणि साऱ्याला एक नवं स्वरूप प्राप्त झालं.

किंगचं सबंध नांव : ऑर्फिअस एच. फिशर. कुणी त्याला ' रॅझल ' म्हणूनही म्हणत. शाळेंत असतांना आमचा परिचय झाला. तेव्हां तो आर्ट स्कूलमध्यें होता. विल्मिंग्टनहून दर दिवशीं यासाठीं तो फिलाडेल्फिआला येई. संध्याकाळीं स्कूल सुटल्यावर तो आमच्या घरीं यायचा आणि मग आम्ही ग्रामोफोनवर रेकॉर्डस् लावीत बसत असूं.

एक दिवशीं किंग मला म्हणाला, "माझ्या घरीं चल." त्याच्या घरचीं माणसं फार चांगलीं आणि सज्जन होतीं असं मी ऐकलं होतं. त्याबद्दल त्यांची मुळीं प्रसिद्धीच होती. किंगच्या घरीं जायचं म्हटल्यावर मी तर गोंधळून गेले. त्यापूर्वी त्याचं घर मी पाहिलंच नव्हतं असं नव्हे; पण यावेळीं मला बोलावण्यांत त्याचा हेतू विशेष होता. त्याच्याबरोबर येतांना मी पोषाख कोणता करावा आणि कसं दिसावं याविषयींहि त्याचे कांहीं आग्रह दिसत होते.

वॉशिंग्टनला आम्ही गेलों. त्यानें प्रथम आपल्या बहिणींकडे मला नेलं. त्याच्या सगळ्या बहिणींचीं लग्नं झालीं होतीं आणि जी ती आपापल्या संसारांत होती. रात्रीचं आमचं जेवण किंगच्या घरीं झालं. हें सर्व कां, त्याचा खुलासा त्यानें आम्ही परत फिलाडेल्फिआला पोंचेपर्यंत अवाक्षरानें केला नाहीं. फिलाडेल्फिआला आल्यावर आपल्या या बेतामागचा

उद्देश त्यानें सांगितला. अशा तऱ्हेनें कीं, जणूं मला पत्ताच लागला नव्हता!

त्यापूर्वीच त्यानें मला एकदां एक गोष्ट सुचवली होती. घरून पळून जाऊन आम्ही लग्न करायचं! पण तेव्हां मी त्याला उत्तेजन दिलं नव्हतं. एक तर माझ्या गाण्याच्या व्यासंगांत मी आकंठ बुडालेली होते, आणि शिवाय तशी लग्नाची कांहीं घाईही नव्हती. आमच्या भेटी गांठी त्यानंतर वरचेवर होतच होत्या. किंगच्या घरीं जाऊन आले तरीहि आमच्या संबंधांना निश्चित असं कांहीं स्वरूप आलंच नाहीं. आम्ही फक्त भेटत होतों, एकमेकांच्या सहवासांत गोडी मानीत होतों.

किंगनें आर्टस्कूलचा अभ्यासक्रम पुरा केला आणि मग तो न्युयॉर्कला पुढल्या शिक्षणासाठीं, तसा कामधंद्यासाठीं गेला. तो गेला आणि माझी अवस्था वेड्यागत झाली. मी खूप रडले. हा वेळपर्यंत असं कांहीं होईल, आहे, याची कल्पनाच नव्हती. किंगलाही त्याच्या जाण्यानें मी अशी हळवी झाले याची कल्पना नसेल. नंतर आमचा पत्रव्यवहार होत होता, परन्तु पत्रलेखनांत माझी गति नव्हती. कधीं तो मला फोनही करी.

एखाद्या व्यवसायांत मन घातलं कीं माणूस अनेकदां मग त्या व्यवसायाचं होतं. आणखी कशाला वेळच सांपडेनासा होतो. तसं आमचं झालं. किंग त्याच्या आर्किटेक्टच्या व्यवसायांत बुडाला, मी गाण्यांत गुंतून राहिले. असं चांगलं १९४३ पर्यंत होत राहिलं. किंगच्या, आणि मग माझ्याहि मनांतला उद्देश तसाच टांगता रहावा, अशी विधीच्छा दिसत होती.

माझ्याभोंवती घोंटाळत मी बरीच पुढें आले. खरं म्हणजे न्युयॉर्कच्या टाउन हॉलमधल्या त्या फसलेल्या कार्यक्रमानंतर, घर मला वादळांतल्या निवाऱ्यागत झालं होतं. हळू हळू जखमा भरूं लागल्या. मी उगींच थोडथोडा वेळ पिआनोशीं बसून खुडबुडूं लागले. एकादी गत वाजवावी, एकादं गाणं अर्धमुर्धं गुणगुणावं. भीति आतां उरली नव्हती. त्या कार्य-क्रमाच्या स्मृतीचा कांटा अंगावर उठेनासा झाला होता. नवा धीर येत होता. तशीच हळू हळू मी गायनशिक्षक बोघेटींकडे जाऊं लागले.

त्यांच्या प्रोत्साहनानें गाऊं लागले. कार्यक्रमही घेऊं लागले. बिली बिग-बरोबर मग पूर्ववत् फिरती सुरू झाली.

पुन्हा सारं स्थिरस्थावर झाल्यासारखं होतं. हरखण्याइतकं कांहीं यांत नव्हतं तरी पण खर्च भागून थोडे फार पैसे बाजूला पडूं लागले होते. आईचे रोजगार चालूच होते. बाबांच्या निधनानंतर ती जी कामाला बाहेर पडली ती कायमची. बेनमेकर स्टोअरमध्यें ती आतां कामाला होती. पगार बरा नव्हता; पण जें कांहीं मिळे तें तरी खात्रीचं होतं.

अलिकडे आई थकत चालली होती हें आपापल्या उद्योगांतही आम्हां बहिणींच्या ध्यानांत आलं होतं. एकेकदां ती गळून जाई. तिला कामांतून मुक्त करून घरीं बसवलं पाहिजे असं माझ्या मनांत वारंवार येई.

ती वेळ अवचित आली. एकदां संध्याकाळची आई कामावरून घरीं आली ती म्हणत कीं, ‘ मला ’ वाटत नाहीं. ’ तिचा तिनेंच कांहीं दिवसांनीं निर्णय घेतला कीं कामावर जायचं नाहीं. आणि कांहींशा समाधानानें मी तिच्या नोकरीच्या जागीं फोन केला, “ माझी आई कामावर परत येणार नाहीं. ”

माझ्या आईविषयीं कांहीं विस्तारानं इथं लिहिणं कठीण आहे. या छापील पुस्तकांत तिच्याविषयीं मी चर्चा केलेली तिला आवडणार नाहीं. ती बावरून जाईल. ‘ कशाला ? ’ म्हणून डोळे वटारून विचारील. पण तरीही मी आईविषयीं इथं लिहिणार आहे. माझ्या कर्तृत्वाचं बहुतेक श्रेय तिला दिलं पाहिजे. तिनें कधींही मला हें कर, तें करूं नकोस असले सल्ले दिले नाहींत; जुलूम तर बिलकूल केले नाहींत. मी सुखी रहावं याव्यतिरिक्त तिची आणखी कुठलीही इच्छा नव्हती.

आईनें आम्हांला ऐहिक सुखांपलिकडचं एक फार महत्त्वाचं सुख दाखवलं. तिनं ईश्वराविषयीं आम्हांला सतत जागृत ठेवलं. ती स्वतः ईश्वराची प्रार्थना न चुकता करी आणि लहान वयांतही ती आम्हांला ती नियमानें करायला लावीत असे.

अद्यापही मी तशी धार्मिक आहे. दर रविवारीं चर्चमध्यें जाण्याचा रिवाज मी ठेवलेला नाहीं; पण मी ईश्वरापुढें नेहमींच लीन राहिले आहे,

त्याला काय वाटेल याचा विचार मनाशीं करीत आले आहे. तरी मी दैववादी मात्र नाहीं. दैववाद ईश्वराला मान्य असणं शक्य नाहीं. तुमचे प्रश्न तुम्हीच सोडवले पाहिजेत. सारखे 'खाटल्या'वर ध्यानस्थ बसून राहिलात तर 'हरी' तुमचा निर्वाह चालवील हें मुळींच शक्य नाहीं. माणसानें आपली कायिक, मानसिक, बौद्धिक ताकद वापरली पाहिजे. शर्थ कराल तरच अपयशांचा, चुकांचा जबाब द्यायला तोंड राहील. ईश्वरी सहाय्या-शिवाय, कवळ माझ्या कर्तृत्वानें, मी आले इतकी पुढें आले असते असं मला वाटत नाहीं.

आमचं कुटुंब एकमेकांना धरून आहे आणि तें केवळ गरजेपोटीं नव्हे तर प्रेमानें धरून आहे यांत आईला परमसुख वाटतं. तिच्या शिकवणुकीचच आमचा एकोपा हें फळ आहे.

● ●

# सोनियाचा दिवस

बिली किंग आणि मी त्याच त्या गांवांतून, संस्थांतून, एका त्याच त्या आवर्तांत फिरूं लागलों होतों. पुढें सरकणं थांबलं आहे असं एकसारखं वाटत होतं. आणि संगीताच्या स्पर्धांनीं आम्हांला हात दिला. पहिली स्पर्धा फिलाडेल्फिआंत फिल्हार्मोनिक सोसायटीतर्फे झाली. मी तिथं काय गायले तें मला आतां आठवत नाहीं. माझा पहिला क्रमांक आला. मला प्रशस्तीपत्रक मिळालं. स्पर्धकांची संख्या मोठी नव्हती. पण वृत्तपत्रांतून रिपोर्ट प्रसिद्ध झाले. त्यांत माझं नांवही सर्वत्र झळकलं. त्या स्पर्धेत बक्षिस मिळविणारी मी पहिली नीग्रो होते. १९२३ मधली ही गोष्ट.

१९२५ मध्यें न्युयॉर्कमध्यें लुइसॉह्न् स्टेडियम कन्सर्ट्स या संस्थेच्या विद्यमानें एक अधिक मोठी स्पर्धा झाली. परीक्षक बाल्कनींत एकटेच बसलेले होते. प्रेक्षागृह स्पर्धक, शिक्षक आणि साथीदारांनीं फुललं होतं. माझा क्रम कधीं येतो म्हणून मी उतावीळ झाले होते. माझ्याबरोबरचे माझे संगीत–शिक्षक बोघेटी यांचीही अवस्था कांहीं वेगळी नव्हती.

इतर स्पर्धकांचे कार्यक्रम ऐकत असतांनाच एक गोष्ट आमच्या ध्यानीं आली ती अशी कीं परीक्षक वेळ वांया दवडण्याला तयार नव्हते. अध्यें मध्यें केव्हांही त्यांची घंटी किणकिणे; कीं तात्काळ थांबून स्पर्धकानें व्यासपीठाखालीं उतरायचं.

माझा क्रम ४४ अ हा होता. तो जवळ आला तशी बोघेटी माझ्या कानांत पुटपुटले, "कांहीं झालं तरी तुझं गीत पुरं कर आणि मगच थांब." त्यांची आग्रही सूचना चांगली होती परंतु मी मात्र परीक्षकांचा इषारा मानण्याचं, स्पर्धेचा नियम पाळण्याचं मनाशीं ठरवलं.

माझा क्रम आला. आणि आश्चर्य असं कीं परीक्षकांनीं मला सबंध गीत म्हणूं दिलं. गात असतांना एकसारखं माझं अवधान त्या किण-किणणाऱ्या घंटेकडे होतं; परंतु ती वाजलीच नाहीं.

आम्ही बाहेर पडलों तेव्हां कुणीच आम्हांला कांहीं म्हणालं नाहीं. मी फिलाडेल्फिआला परत आले. कांहीं दिवसांनीं बोघेटींनीं कळवलं कीं, "तुला सेमी-फायनल्ससाठीं निवडली आहे. निवडलेल्या सोळा उमेदवारांत तूं आहेस."

सेमी-फायनल्सच्या दिवशीं उकाडा फार होता. वाईट हवा पडली होती. मी माझं मागल्या वेळचं गीत आणि आणखी दोन गीतं म्हटलीं. या वेळींहि माझ्या कार्यक्रमाबाबत कुणी आम्हांला बरं वाईट सांगण्याची तसदी घेतली नाहीं. त्या स्वरूपाचं कांहीं कळेल म्हणून मी बोघेटींच्या स्टुडिओंत थोडी राहिलेही. आमच्या माहितीप्रमाणें अंतिम स्पर्धेसाठीं फक्त चार उमेदवारांची निवड होणार होती.

टेलिफोन आला म्हणून बोघेटींनीं जाऊन तो घेतला आणि ते हर्षभरानें ओरडत आले, " आपण जिंकलों ! अंतिम स्पर्धाच होणार नाहीं."

दुसऱ्या दिवशीं साऱ्या वृत्तपत्रांत स्पर्धेच्या विस्तृत बातम्या होत्या. बक्षिससमारंभाला माझ्या घरचीं माणसं, इतकंच नव्हे तर स्नेहीसंबंधित देखील फिलाडेल्फिआहून मुद्दाम येऊन उपस्थित राहिले. २६ ऑगस्ट १९२५ ला रात्रीं हा समारंभ लुइसॉह्न स्टेडियमवर झाला. या निमित्तानं माझं गायनही होणार होतं. साथीला न्युयॉर्क फिल्हार्मोनिक सोसायटीचे वादक असणार होते.

ती वेळ आली. वादकांच्या त्या ताफ्यांत, प्रशस्त व्यासपीठावर जाऊन 'कंडक्टर'जवळ उभं रहातांना रोमांचांनीं अंग फुलून गेलं. अभिमानानें ऊर भरून गेलं. समोर चित्रविचित्र चेहऱ्यांचा समुद्र पसरला होता. स्टेडिअम भरून गेलं होतं. टाळयांचा प्रोत्साहनपर कडकडाट झाला. मी गाऊं लागले.

मी गडबडले नव्हतेच, असं मी म्हणणार नाहीं. कारण आंत कुठं तरी न्युयॉर्कमधल्याच टाउन हॉलमधल्या जुन्या फजितीची

आठवण होतीच. परंतु गाऊं लागतांच वृत्ति स्थिरावल्या आणि मला वाटतं, मी बरी गायले.

त्या हंगामांत या स्पर्धेतल्या यशामुळें आम्ही जास्त उत्पन्न केलं. माझी बिदागी आतां कार्यक्रमाला साडेतीनशें डॉलर्स झाली होती.

याच निमित्तानें मी आर्थर जड्सनच्याही नजरेत आले. संगीत कार्यक्रमांचा तो एक प्रमुख कंत्राटदार होता. त्याच्या अखत्यारांत गाऊं लागल्यावर पहिल्या वर्षी कार्यक्रम कमी झाले; पण बिदागी वाढवलेली होती. उत्पन्न घटलं नाहीं. नवनवीन खर्च मात्र उद्भवत होते. बिली किंगची बिदागी वाढली होती आणि ती वाजवीही होती. शिवाय कपड्यांचा प्रश्न महत्त्वाचा झाला होता. केवळ एका ईव्हिनिंग गाउनवर आतां भागत नव्हतं.

माझ्या भागांत गातांना, उंची कपड्यांची आवश्यकता मला आतां जाणवूं लागली होती. ते सारे लोक गरीब होते, उंची कपड त्यांनीं कधीं फारसे वापरलेही नसतील. परंतु म्हणूनच कीं काय, त्यांच्यांतल्या मारिअन ॲण्डर्सन या गुणी गायिकेनें चांगलेचुंगले पोषाख करून रुबाबांत राहिलं पाहिजे अशी त्यांची इच्छा दिसत होती.

पुन्हां एकवार या काळांत वर्तुळाकार गति जाणवूं लागली. कार्यक्रमांत कांहीं नवीन फारसं होत नव्हतं, नवीन कार्यक्रमही विशेष नव्हते. त्याच त्याच जागा, तेच तेच लोक. युरोपला जावं असं मनांत घोळूं लागलं होतं.

कंत्राटदार जड्सननीं मला फ्रँक ल फोर्ज या उत्तम वादक-शिक्षकाकडे मेहनत घेण्याला सुचवलं. ल फोर्ज यांच्या ओळखीही मोठ्या होत्या; मला त्यांचा तसा फायदाही होण्यासारखा होता.

एवढ्यानं भागेल असं मला मात्र वाटत नव्हतं. कांहींतरी अधिक झालं पाहिजे, केलं पाहिजे असं मन घोकत होतं. ल फोर्जकडे मी जाऊं लागले तरीहि मनांतला युरोप सुटला नाहीं. ल फोर्ज यांचाही तसा विरोध दिसला नाहीं. एकदां तर बोलता बोलता ते म्हणाले, “ युरोपला गेलीस तर निदान एक होईल ; तुझा दिमाख उतरेल. ”

“ तर मग जाणारच मी. ” मीहि म्हणाले. “ केवळ या हेतूनें जाणार. ”

● ●

# पहिलं देशाटन

युरोपला जाण्याचा निर्णय तसा सहजासहजीं घेतला गेला नाहीं. सर्वात महत्त्वाचा प्रश्न पैशांचा होता. माझे बँकेंतले सांठ्याचे सर्व पैसे काढून मी बोटीचं दुसऱ्या वर्गाचं तिकिट मिळवलं.

सफर चांगली झाली. बहुतेक वेळ मी एकएकटीच होते, तरीहि चांगली झाली. इंग्लंडला पोंचल्यावर लंडनमध्यें मी कांहीं दिवस राहिले. मग स्टेयनिंग या ससेक्समधल्या गांवीं रेमंड व्हॉन झर मुल्हेन यांना भेटण्यासाठीं गेले. त्यांच्याकडे मी प्रथम शिकणार होते. त्यांची प्रसिद्धि मी फार ऐकली होती. भेटायला जातांना भीत भीत गेले. ते वयस्क होते. एका प्रशस्त दालनांत ते मांडीवर रग पांघरून एका आरामखुर्चीसारख्या खुर्चीत बसलेले होते. दालनांत पलिकडल्या कोपऱ्यांत एक पिआनो होता.

झर मुल्हेन यांनीं जवळच एक वेताची काठी ठेवली होती. लक्ष वेधून घ्यायचं असलं किंवा कांहीं महत्त्वाचं सांगायचं असलं कीं ते ती काठी जमिनीवर आपटून बोलत. किंचित्काल बोलणं झाल्यावर ते म्हणाले, "थोड्या गा अर." पलिकड बसलेला एक इंग्लिश तरुण पिआनोशीं साथीला बसला आणि मी गाऊं लागले : 'Im Abendrot...'

गाणं संपल्यावर ते म्हणाले, "इकडे या."

मी त्यांच्याकडे गेले. चालतांना तें अंतर प्रदीर्घ वाटलं.

"या गाण्याचा अर्थ कळतो तुम्हांला ?" त्यांनीं विचारलं.

"शब्दशः नाहीं;" मी म्हणाले. "साधारण. मला याबद्दल लाज वाटते."

"अर्थ कळत नाहीं तर गाऊं नका." ते कांहींसे कोपानें उद्गारले.

मी चिकाटीनं म्हटलं, "अर्थ कळत नाहीं असं नव्हे; ढोबळ अर्थ कळतो. शब्दशः अर्थ कळलेला नाहीं, इतकंच."

"तेवढा पुरेसा नाहीं." त्यांनीं काठी आपटून बजावलं.

आणखी कांहीं त्यांनीं मला गायला सांगितलं. यावेळीं मी एक इंग्लिश गाणं म्हणूं लागले. त्याचा अर्थ मला शब्दशः माहीत होता.

मी तें संपवण्याआधींच ते जमिनीवर काठी बडवीत ओरडले, "जरा थांबा. एकाद्या सूरसम्राज्ञीसारख्या गाऊं नका. मी अद्याप राज्याभिषेक केलेला नाहीं तुम्हांला !"

ते संतापी होते; परंतु कठोर नव्हते. आम्ही यानंतरही कांहीं संभाषण केलं. मी निघाले तेव्हां त्यांनीं मला शुबर्टच्या गाण्यांचं एक पुस्तक दिलं आणि त्यांतलं पहिलंच शिकायला सुचवलं.

मग सात आठ दिवस मी त्यांच्याकडे पुन्हा जाऊं शकले नाहीं. ऑम्ब्रॉसिसच्या विकारांतून ते बरे होत होते त्यामुळें शिकवणंहि स्थगित होतं. कांहीं दिवसांनीं कळलं कीं त्यांना शिकवणंच थांबवायला डॉक्टरांनीं सांगितलं आहे.

माझी खूप निराशा झाली. फक्त एक दोन भेटींतच माझी खात्री झाली होती कीं माझ्यापुढच्या कांहीं अत्यंत निकडीच्या संगीतविषयक समस्याचं उत्तर या माणसापाशीं आहे. आतां पुन्हा दुसरा एकादा माणूस शोधणं भाग होतं. मार्क राफेल मला भेटले.

लंडनमधल्या माझ्या वास्तव्यांत माझा बहुतेक काळ रीजंट्स पार्क रोडवरच्या जॉन पेनच्या निवासस्थानाभोंवतीच व्यतीत होत होता. जॉन पेन माझ्याशीं अत्यंत स्नेहपूर्णतेनें वागला. रविवारचे त्याचे किती तरी मित्र त्याच्याकडे येत. त्यांतले अनेक वादक आणि संगीतवेडे होते. मग जलसे होत. आणि मोठी बहार उडे.

मग पुढें रॉजर क्विल्टरच्या घरींही माझा शिरकाव झाला आणि त्याच्या मित्रमंडळांत त्याच्या पिआनोच्या साथीवर मी अनेकवार गायले. विगमोअर हॉलमध्यें माझं गाणं व्हावं असा बूट इथं निघाला आणि क्विल्टरच्या खटपटीनं तसं प्रत्यक्षांत घडलंही. सर हेन्री वुड यांच्याशींहि माझी गांठ घालून देऊन या मंडळींनीं प्रोमेनेड कन्सर्ट्सच्या विद्यमानें माझा एक कार्यक्रम घडविला.

लंडनमधल्या माझ्या मुक्कामांत मी तयारीची गायिका म्हणून गायलेच नाहीं; मी जवळ जवळ संगीताच्या विद्यार्थिनीची भूमिका ठेवली. वर्ष-भराच्या अनुपस्थितीनंतर अमेरिकेला परतल्यावर माझ्या जमेला कुठ-लाही विशेष पराक्रम, दिग्विजय असणार नव्हता. उदाहरणार्थः मी समजा इंग्लंडच्या राजकुटुंबापुढं गायले असते तर तो पराक्रम ठरला असता. माझ्या प्रवासाचा फायदा मला होत आहे असं मला स्वतःला वाटत होतं, पण प्रत्यक्षांत तो पटवणं, वटवणं अशक्यप्राय होतं.

घरीं परतणं जरूर होतं. पैसे संपत आले होते. शिवाय मी ठराविक मुदतींत परतेन या बोलीवर अमेरिकेंत कांहीं कार्यक्रमही पक्के करून ठेवण्यांत आले होते. आणि या साऱ्याबरोबर हेंही खरं होतं कीं मला घराची, आईची, बहिणींची तहान लागली होती.

अमेरिकेला परतले तेव्हां फार कमी कार्यक्रम ठरलेले दिसले. माझी निराशा झाली. मनांत असंही आलं कीं या परिस्थितींत वेगळं कांहीं होऊं शकत नव्हतं. इंग्लंडला जाण्याआधींच्या उत्पन्नांत अद्यापही घट नव्हती; कारण बिदागीची रक्कम वाढवली होती. अमेरिकेला परतले आणि थोड्या दिवसांतच वाटूं लागलं कीं परत युरोपला जावं. या खेपेला आर्थिक दृष्टया हें जमेल कसं, हा विचार सुचत होता, पण मी तो ठरूंच देत नव्हते. स्वप्नरंजनांत, तशा ध्यासांत सुख वाटत होतं. वाटे कीं गेलं हें पाहिजेच; आणि जायचं तर मार्गही सांपडेल. यावेळीं जर्मनीला जाण्याचा विचार घोळत होता.

शिकागोला एका कार्यक्रमाच्या वेळीं चिठ्ठी आली, कीं कुणी राफेल वा तशा कांहीं नांवाचा माणूस भेटूं इच्छित आहे. मला आनंद वाटला. राफेल म्हणजे मार्क राफेल. आणि तो शिकागोंत काय करीत होता ?

कार्यक्रम संपल्यावर तो माणूस येऊन भेटला. तो मार्क राफेल नव्हता. तो होता रे फील्ड. त्याच्याबरोबर मिस्टर जॉर्ज आर्थर होते. दोघे ज्युलिअस रोजेनवाल्ड निधीचे प्रतिनिधि म्हणून मला भेटायला आले होते. ते खूप मोकळेपणीं आणि आपुलकीनें बोलले. माझ्या इच्छा-आकांक्षांविषयीं त्यांना एक प्रकारची कळकळ दिसली. माझे पुढचे बेत त्यांनीं विचारले आणि मी जर्मनीला जाण्याचा मनोदय बोलून दाखवला, तिथं जाण्याची आवश्यकताहि सांगितली. त्यांनीं मला आपल्या कचेरींत येण्याचं आमंत्रण दिलं. तिथं मी गेले तेव्हां त्यांनीं सांगितलं कीं मी जर्मनीला जाणार असेन तर निधींतून मला मदत मिळेल.

लौकरच मग मी युरोपकडे जाणाऱ्या जर्मन बोटीवर चढले. बर्लिन-मध्यें मी रहाणार होते. मायकेल रॅचेसेन यांच्याकडे मी जर्मन संगीताचे धडे घेणार होते.

बर्लिनमध्यें हे धडे मी घेत असता एक दिवशीं रॅचेसेनच्या स्टुडिओंत दोन नवखीं माणसं आलीं.

आमचा पाठ संपेपर्यंत तीं मुकाट बसून राहिलीं. ते दोघे होते अनुक्रमें संगीत कार्यक्रमांचा नॉर्वेजियन मॅनेजर रूल रासमुसेन आणि फिन्लंडचा प्रसिद्ध पिओनोवादनकार कोस्टी व्हेहानेन. नवनवीन गायकांच्या शोधांत ते दोघे जोडीनें दौऱ्यावर होते.

कांहीं कार्यक्रमांपुरती मी त्यांना उपलब्ध होईन का, म्हणून त्यांनीं मला विचारलं आणि मी तशी शक्यता दर्शवली. रासमुसेन म्हणाले, "तुम्ही नॉर्वेला याल तर हे कोस्टी व्हेहानेन तुम्हांला पिआनोची साथ करतील."

परंतु प्रथम मला बर्लिनमध्यें गाण्याचा एक मोठा कार्यक्रम हवा होता. मी कधीं केलं नव्हतं, पुढं परत केलंही नाहीं तें केलं. माझे ५०० डॉलर्स घालून 'बॅक्साल' थिएटरमध्यें एक रात्र घेतली; आणि त्या रात्रीं मनसोक्त गायले. कार्यक्रम संपल्यावर बरींच माणसं भेटायला आलीं. कुणी स्वाक्षऱ्यांसाठीं, कुणी केवळ प्रशंसेचे चार शब्द बोलण्यासाठीं. मला जर्मन फारसं कळत नव्हतं. पण जें कळत होतं त्या जोरावर कळलं तें फार चांगलं होतं.

दुसऱ्या दिवशीं वृत्तपत्रं मोठ्या उत्सुकतेनं न्यहाळलीं. पण त्यांत कुठें माझ्या कार्यक्रमाबद्दल अवाक्षरही नव्हतं. असं कां तें मला कळेना.

मग कळलं तें असं कीं, जर्मनी म्हणजे अमेरिका नव्हे. तिथें वृत्तपत्रीय समीक्षकांना आपलीं समीक्षणं छापवून आणण्याची कुठलीही घाई नसते. जवळ जवळ आठवड्याभरानं समीक्षणं छापून येऊं लागलीं. बहुतेक-जणांनीं स्तुति केली होती. एक दोघांना माझं गाणं पसंत पडलं नव्हतं. पण एकमुखी प्रशंसेची मी अपेक्षाही केली नव्हती.

विशेष हें कीं, बर्लिनमधल्या त्या मुक्कामानंतर पुन्हा १९५० पर्यंत तिथं गाण्याचा योग आला नाहीं. पुन्हा गायले ती अमेरिकनव्याप्त भागांत आमच्या नियंत्रण–अधिकाऱ्यांच्या विद्यमानें.

● ●

## स्कँडिनेव्हियांतलं यश

'बॅक्साल' मधल्या यशस्वी कार्यक्रमानंतर मी उत्तरेकडे कार्यक्रम घेतले. नॉर्वेतल्या कार्यक्रमांवर प्रतिक्रिया आल्या त्यांत फटकळपणा होता आणि औत्सुक्यही होतं. तिथल्या लोकांना नीग्रो गायकांची संवय नव्हती. एका वृत्तपत्रांत म्हटलं होतं, "गायिकेनें तळपत्या निळ्या रंगाचा झगा परिधान केला होता आणि ती चॉकोलेट बारसारखी दिसत होती." कुणी कांहीं, कुणी कांहीं म्हटलं होतं. यांत पूर्वग्रह नव्हता. केवळ नवल होतं.

पहिला कार्यक्रम होतांच दुसऱ्याचीं तिकिटं धडाधड विकलीं गेलीं. आमच्या मॅनेजरला आणि मला श्रोत्यांकडून सूचनांचीं पत्रं येऊं लागलीं.

मी स्टॉकहोमला गेले, हेल्सिंकीला गेले. तिथून कोपनहॅगनला गेले. कोपनहॅगन मला आपलं वाटलं. कारण तेथील लोकांच्या रसिकतेआड माझा रंग तिळमात्र येत नव्हता, केवळ एक माणूस आणि कलावन्त म्हणून ते माझ्याकडे पाहूं शकत होते.

स्कँडिनेव्हियन टापूंतला दौरा उत्साहवर्धक ठरला. संगीतासाठीं होणारी माझी तपश्चर्या व्यर्थ नसल्याची माझी खात्री या दौऱ्यांत पटली. मला गांठायचं होतं तें शिखर माझ्या झेंपेंत होतं हेंही समजलं.

पुऱ्या सहा महिन्यांचा हा काळ हां हां म्हणतां संपला आणि मला अमेरिकेला परतावं लागलं. स्कँडिनेव्हिअन टापूंतल्या यशाची थोडी फार वर्दी आधींच मायदेशीं पोंचली होती. परंतु तेवढ्यानें अमेरिकन कार्यक्रम-नियोजकांवर फारसा परिणाम झाला नव्हता. अमेरिकेंत पुन्हां जुनंच

ठराविक कार्यक्रमांचं रिंगण मी फिरूं लागले आणि पुन्हां युरोपच्या ओढीनं उसळी घेतली. १९३३ मध्यें मी परत युरोपला गेले. या खेपेस दोन वर्षांहून अधिक काळ मी युरोपांत राहिले. यांतला बहुतेक काळ स्कँडिनेव्हिअन टापूंतच गेला. वृत्तपत्रांतून मला भरपूर प्रसिद्धी मिळत होती. लेख, मुलाखती, छायाचित्रं, व्यंगचित्रं...एका वृत्तपत्रानं तर शब्दप्रयोगच बनवला : 'मारिअन फीवर.' ('मारिअन–ज्वर.')

फिन्लंडचा विख्यात आणि लाडका संगीतकार जीन सिबेलिअस याच्या रचनांचा अभ्यास मी या काळांत आवडीनें केला. त्यानंतर कोस्टीच्या मदतीनें खुद्द सिबेलियस यांच्या भेटीचाच योग आला, कोस्टी म्हणाला, "त्यांना तुझं गाणं ऐकवायला हवं." मी म्हणाले, "खरंच असं करा."

कोस्टी म्हणाला, "जरा दम धर. बहुतेक मी तो योग जमवतों."

योग जमला. सिबेलियस यांच्या घरीं आमचं स्वागत खूप अगत्यपूर्वक झालं. मी तिथं सिबेलियस यांची जर्मन रचना गाऊन दाखवली. त्यांचींच इतरही कांहीं गीतं म्हटलीं. माझं गाऊन संपतांच ते जागचे उठले. माझ्याकडे आले. मला कवेंत घेऊन म्हणाले, "ही जागा तुझ्यासारखी-साठीं फार खुजी आहे. तुला अस्मान हवं." बायकोला ते म्हणाले, "हें पहा, कॉफी नको. शांपेन!"

लंडनमध्यें माझा जाहीर कार्यक्रम झाला. अपेक्षेइतका तो यशस्वी झाला नाहीं. वृत्तपत्रांतल्या प्रतिक्रिया बऱ्याच सौम्य आणि त्रुटित होत्या. पॅरिसमध्यें मात्र मनासारखं सर्व जमलं. पहिला कार्यक्रम फार छान गेला म्हणून मॅनेजर मिस्टर होरोविट्झ यांनीं दुसरा सुचवला. (हिटलरी राज-वटीपूर्वी बर्लिनमध्यें यांचं वजन बरंच होतं.) दुसरा पहिल्याहूनहि चांगला गेला. पुन्हां मिस्टर होरोविट्झनीं तिसरा सुचवला. माझ्या संगीत–कलेशीं निगडित जीवनांत या कार्यक्रमानें मोठा बदल घडवून आणला. या कार्यक्रमामुळेंच मिस्टर सॉल हुरोक मला भेटले. किंवा वाटल्यास, मी त्यांना भेटले.

बऱ्याच वर्षांपूर्वी, अमेरिका सोडली तेव्हां मिस्टर हुरोक यांची गांठ घेण्याचा प्रयत्न मी केला होता. परंतु तें जमलं नव्हतं.

पॅरिसमध्यें, तिसऱ्या कार्यक्रमाच्या मध्यंतराच्या वेळीं मिस्टर होरोविट्झ मिस्टर हुरोकना घेऊन आले. आयत्या वेळीं या कार्यक्रमाला उपस्थित रहाण्याचं मिस्टर हुरोकनीं ठरवलं होतं.

आपण एकदां भेटूं या, असं अगदीं औपचारिकपणें मिस्टर हुरोक म्हणाले. मग त्यांनीं दिवसही विचारला. ‘पुढच्याच दिवशीं ? उद्यां ?’ मी लागलींच होकार दिला. पुढें मी कार्यक्रमांत काय गायले तें आठवत नाहीं. पुन्हा एकवार, मी ‘मी’ नव्हते आणि कार्यक्रम केव्हां तरी संपला खरा.

दुसऱ्या दिवशीं कोस्टीला घेऊन मिस्टर होरोविट्झच्या कचेरींत मी गेले. तिथं मिस्टर हुरोक बसलेले होते. अजून तो प्रसंग स्मरणांत ताजा आहे. मिस्टर हुरोक आम्हांला एवढे मोठे वाटले कीं कोस्टी काय, मी काय, त्यांच्यापुढें किरकोळ झालों. आरंभीच बोलता बोलतां हुरोकनीं छडीवजा काठी जमिनीवरून उचलून पुढ्यांतल्या टेबलावर रोंवली आणि त्यांचे रुंद खांदे अधिकच रुंदावले. शक्य असतं तर मी तिथून पळालेच असते.

त्यांचं बोलणं संथ होतं. अमेरिकेंत माझे कार्यक्रम सालीना किती होत आणि त्यांचं उत्पन्न साधारणपणें किती येई त्याची चौकशी त्यांनीं केली. आणखीही प्रश्न विचारले. अखेर मला हवं होतं तेंच ते नेमकं म्हणाले : “मी तुमच्यासाठीं कांहीं करूं शकेन.”

कोस्टी आणि मी, आम्ही तिथून बाहेर पडलों तेव्हां शर्यतीच्या अखेरच्या टप्प्याच्या अखेरीपर्यंत पोंचलेल्या स्पर्धकासारखं मला वाटत होतं. कोस्टीही नेहमींचा उरला नव्हता. आम्ही रस्त्यावर पोंचलों तेव्हां तो म्हणाला, “मारिअन, आतां प्रथम थोडं मद्य घेऊन भानावर आलं पाहिजे.”

तपशील आंखण्यांत आला. करारावर सह्या झाल्या. दरम्यान युरोपभर माझे कार्यक्रम होत होते. ब्रुसेल्स, जिनेव्हा, व्हिएन्ना, साल्झबर्ग, आणखीही इतर शहरीं.



नों: दि:

साल्झबर्गला माझ्या श्रोतृसमुदायांत जगप्रसिद्ध संगीतनिर्देशक आर्टुरो टोस्कॅनिनी होते. मध्यन्तरांत, मादाम कॅव्हिएर यांच्याबरोबर रंगपटांत येऊन ते मला भेटून गेले. त्यांना पाहून हृदय इतकं उचंबळून आलं कीं ते काय म्हणाले आणि मी काय म्हणाले त्याचं मला भानच उरलं नव्हतं. बहुतेक मी आपली पुनःपुन्हा 'थँक यू, सर" 'थँक यू व्हेरी मच' असंच कांहीं तोंडांतल्या तोंडांत पुटपुटत असावी. टोस्कॅनिनींचे शब्द मी अवधानपूर्वक ऐकूं शकले नाहीं. तरी मादाम कॅव्हिएरनीं ते ऐकले होते. त्यांनीं ते नन्तर सांगितले. टोस्कॅनिनी म्हणाले होते, "बाई, तुमच्यासारखा आवाज शतकांत एखादा ऐकायला मिळेल."

• •

# एका पायावर

युरोपभर अनेक यशस्वी कार्यक्रम केल्यावर मायदेशीं जाण्याची वेळ आली. यानंतर मिस्टर हुरोक यांच्या व्यवस्थेखालीं मी अमेरिकेंत गाणार होते. अमेरिकेला परतण्यांत मला कुठला आनंद वाटतो असं वारंवार विचारण्यांत आलं आहे. मी युरोपांतच कां स्थायिक झाले नाहीं याविषयीं लोक आश्चर्य करतात. कारण, आमच्या रंगाच्या अनेक कला-वंतांना युरोपनं आपलं मानलं आहे. परंतु मला माझ्या कुटुंबियांचा, आप्तजिवलगांचा, स्नेहीसोबत्यांचा विचार करायचा होता. मी माझी होते त्याहून अधिक त्यांची होते. त्यांना मी हवी होते आणि मला ते सारे हवे होते. मला त्यांनीं सर्व प्रकारें सहाय्य केलं तें मी परस्पर युरोपांत 'गहाळ' होण्यासाठीं नव्हे. युरोपला मला त्यांनीं पाठवलं, जाऊं दिलं कांहीं शिकण्यासाठीं, साधण्यासाठीं, परिपूर्ण गायिका होण्यासाठीं. किती झालं तरी मी अखेर अमेरिकेंतच होते. अमेरिकेंत मला परतायला हवं याविषयीं कधींहि माझ्या मनांत संभ्रम नोंदला नाहीं.

माझ्याबरोबर कोस्टी व्हेहॅनेन अमेरिकेला आला. पुढें पांच वर्षं तो अमेरिकेंत आणि युरोपच्या दौऱ्यांत माझ्याबरोबर होता. ३० डिसेंबरला न्युयॉर्कच्या टाउन हॉलमध्यें (माझ्या संस्मरणीय फजितीची जागा.) माझा कार्यक्रम होता. हें आगाऊ कळल्यानें युरोपमध्येंच आम्ही त्याची पूर्वतयारी सुरू केली. बोटीवरही आम्ही तेंच करीत होतों.

प्रवासाला निघाले आणि तिसऱ्या दिवशीं बोटीच्या जिन्यावरून तोल जाऊन मी पडले. उभी राहिले तेव्हां एक पाय घोट्याशीं मुडपूं लागला. वेदनांनीं डोळ्यांपुढें काजवे चमकले. पहिलाच विचार डोक्यांत

आला तो हा, कीं आतां ठरलेल्या कार्यक्रमाचं काय? पुन्हा वाटलं, तो होणार. कां नाहीं होणार?

कोस्टीनें बोटीवरच्या डॉक्टरला आणलं. डॉक्टरसोबत एक नर्सही आली. त्यांनीं माझा दुखरा पाय तपासला. ते म्हणाले, "याची काळजी घ्या. यावर भार टाकूं नका. विश्रांति घ्या." म्हणून मग माझ्या खोलींतच मी पडून राहिले.

न्युयॉर्कला पोंचायचं त्या दिवशीं पायाचं दुखणं कमी होतं. उभी राहिले, चालले तरी तो विशेषसा दुखत नव्हता. स्टॉकहोमला घेतलेला एक बुटांचा सुंदर जोड माझ्याकडे होता. त्याला साजेसा पोषाखही होता. बऱ्याच कालानंतर मी अमेरिकेला येत होते, त्यामुळें मला उतरवून घ्यायला बरींच माणसं येणार हें नक्की होतं; त्यांना कांहीं चुकल्यासारखं, खटकल्यासारखं वाटून चालणार नव्हतं. त्यांचा विरस होता कामा नये होता. या विचारांत, माझ्याजवळचे उत्कृष्ट बूट त्यांनीं पहावेत, मी चांगली दिसावी हा हेतु नव्हताच असं नव्हे. मी बूट घातले. ठेवणींतले कपडे चढवले. आणि बोटीवरून मोठ्या उत्साहानें उतरले. त्यानंतर सतत दिवसभर मी हंसत खिदळत होते, नाचत होते, धांवत होते, चालले तर कितीतरी.

दोन तीन दिवसांनीं क्रिसमस येत होता. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं जागी झाले आणि पायाकडे लक्ष गेलं. बोटं हिरवीं निळीं पडलीं होतीं आणि एक प्रकारचा बधीरपणा सबंध पायांत जाणवत होता. मी घाबरले. बहिणीनें टॅक्सी बोलावली आणि आम्ही इस्पितळांत गेलों. पायाचे 'एक्स रे' काढण्यांत आले. घोट्यांत कांहीं मोडतोड झाली होती. मांडीपर्यंतचा पाय प्लॅस्टरमध्यें टाकण्यांत आला. खालीं बोटं तेवढीं प्लॅस्टरबाहेर डोकावत होतीं.

'एक्स रे' चे फोटो पहात मी डॉक्टरना विचारलं, "हा माझा पाय?"

"असं म्हणायला हरकत नाहीं." ते म्हणाले. निदान दीड महिना प्लॅस्टरमध्यें ठेवला पाहिजे असं ते म्हणाले.

कार्यक्रमाआधीं दोन दिवस मी मोटारनें न्युयॉर्कमध्यें गेले. सोबत एक नर्स होती. अशा मोडक्या, प्लॅस्टरमधल्या पायानेंही मला व्यासपीठावर आणि व्यासपीठावरून आंत कसं काय हलता येईल याबद्दल मी तपास करीत होते. एक ठरलं कीं, मला चाकांच्या खुर्चीतून व्यासपीठावर आणण्यांत येईल तेव्हां पडदा पडलेला असावा. नंतर तो उघडावा. पुढें एकदां मी पिआनोच्या वळणाशीं, त्याच्या आडोशाला कुबड्यांचा आधार टाकून उभी राहिले कीं मग फारसा प्रश्न नव्हता. पायांत अशा वेळीं वेदना होत पण त्या सहन होत. माझ्या मोडक्या पायाबाबत प्रथम श्रोत्यांना दूरध्वनिक्षेपकावरून सांगण्यांत यावं हें मला कबूल नव्हतं. कारण त्यामुळें, तरीहि मी गाते याविषयींच एक प्रकारची सहानुभूति, कींव श्रोत्यांमध्यें निर्माण झाली असती, आणि तीच मला नको होती. मला त्या रात्रीं कुणाचीहि सहानुभूति नको होती. एक कलावन्त, गायिका म्हणून मी श्रोत्यांसमोर उभी रहाणार होते; आणि कलेच्या, रसिकतेच्या मापांनींच माझे गुण मापले जायला मला हवे होते.

हॅंडेलच्या एका रचनेनं आम्ही सलामी दिली. ही रचना फार क्वचित् गायिली जाणारी होती. बहुतेकांना ती अवगत नसे. ती कठीण होती. तिनें आरंभ करणं तर धोक्याचं होतं. कोस्टीच्या एका मित्रानें, युरोपमध्यें मी असतांना मला ती समजावून दिली होती. मी धोका पत्करून ती आरंभालाच गायिली. आवाज मनाजोगता सुटत नव्हता; परन्तु त्यापूर्वीं मी ती गायिली होती त्याहून या खेपेला ती उजवी वठली. असंहि वाटलं कीं श्रोत्यांचीं मनं माझ्या आतां मुठींत आलीं आहेत. आणि अखेर, शेवटचीं ईश्वरभक्तिपर गाणीं म्हणतांना तर मी मनानें अगदीं स्वस्थ होते. एक तर हीं गीतं बालपणापासून मी म्हणत आले होते; आणि मुख्य हें कीं जिथं एकदां नामुष्की पदरीं आली तिथंच माझा कार्यक्रम व्यवस्थित पार पडून आतां त्याचा शेवट आला होता. मी जिंकले होते.

दुसऱ्या दिवशींच्या वृत्तपत्रांतून आलेली स्तुति मन धुंद करणारी होती. त्याबरोबरच जबाबदारीचं ओझंही एकीकडे वाढलेलं जाणवत

होतं. या कार्यक्रमानं माझं स्थान नक्की ठरलं होतं. यानंतर कौतुकाची अपेक्षा करता येणार नव्हती. तुलना होणार होती ती प्रथितशय गायक गायिकांशीं.

पुढें परिस्थितीच अशी घडत गेली कीं मि. हुरोक यांनीं आंखलेले पंधरा कार्यक्रम होऊं शकले नाहींत. परंतु त्याचं त्यांनीं कांहीं मानल्याचं दिसलं नाहीं. मी अप्रत्यक्षपणें ऐकला होता तो एक प्रसंग असाः

पुढें अमेरिकेला आल्यावर मिस्टर हुरोकनीं कुणालासं सांगितलं, " मारिअन अँडर्सनशीं मी कॉंट्रॅक्ट केलं आहे." त्यावर तो दुसरा इसम म्हणाला, " तुमच्या तिच्याविषयींच्या अपेक्षा खऱ्या ठरणार नाहींत."

हुरोक यावर अस्वस्थ झाले नाहींत. त्यांना कांहीं वाटलंच नाहीं. त्यांच्या निर्णयाबाबत त्यांना विश्वास होता. स्वतःला एकादी गोष्ट पटली कीं मग तिच्यासाठीं केवढाही धोका पत्करण्याला ते सदा तयार असत.

त्यानंतरचा न्युयॉर्कमधला माझा पुढचा कार्यक्रम त्यांनीं कार्नेजी हॉलमध्यें ठरवला. त्याची खूप जाहिरात चालवली.

या मोठ्या माणसाचे माझ्यावर खूप उपकार आहेत. या माणसाच्या नेतृत्वाअभावी माझ्याहूनहि गुणी अशा कित्येक कलावंतांना प्रगतीच्या मार्गावर अर्ध्यमध्यें रखडावं लागलं असेल.

अमेरिकेंत मी तीन एक महिने होते. मग पुन्हां युरोपला जावं लागलं. तिथं बरेच कार्यक्रम आंखण्यांत आले होते. या आधींच मी गाण्याचे कार्यक्रम करीत जवळ जवळ सर्व युरोप फिरले होते. पोलंडमध्यें, बाल्टिक देशांच्या भागांत आणि रशियालासुद्धां जाऊन आले होते.

• •

# ईस्टर सण्डे

अमेरिका आणि युरोप, यापैकीं युरोपांतच येथवर माझे कार्यक्रम अधिक प्रमाणांत झाले होते. आतां हें बदललं. मिस्टर हुरोक यांच्या नेतृत्वाखालीं मी गाऊं लागतांच अमेरिकेंत अधिक कार्यक्रम मिळूं लागले; साहजिकच युरोपमध्यें माझा काळ कमी जाऊं लागला.

गायिका म्हणून मला उच्च दर्जा प्राप्त व्हावा हा हुरोक यांचा मुख्य उद्देश होता. माझ्या क्षेत्रांतल्या नामवंत कलावंतांबरोबरीनें माझं नांव व्हावं अशी त्यांची इच्छा होती. त्या हिशेबानं जिथं जिथं उत्कृष्ट गायक गायिका गात होत्या, गायल्या होत्या, जिथं जिथं गुण जाणणारे आणि गुणांची योग्य चहा करणारे श्रोते होते, तिथं तिथं मिस्टर हुरोकनीं माझे कार्यक्रम केले. असंच महत्त्वाचं स्थळः अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन. खूप वर्षांपूर्वी वॉशिंग्टनच्या शाळाकॉलेजांतून आणि चर्चेसमधून मी कार्यक्रम केले होते; परंतु आतां मी गाणार होते तिथल्या श्रेष्ठ संगीत–पीठावरून. कॉन्स्टिट्यूशन हॉल ही ती जागा.

इथें माझा कार्यक्रम व्हावा या मिस्टर हुरोक यांच्या निर्णयाला पुढें बरंच महत्त्व प्राप्त झालं. एकदां मिस्टर हुरोक यांच्याकडे सर्व सोंपवल्यापासून मी कार्यक्रमांच्या जागांच्या आणि तत्संबंधींच्या इतर ठरवाठरवींत मुळींच लक्ष घालत नसे. कॉन्स्टिट्युशन हॉलमध्यें माझा कार्यक्रम व्हावा इतकं ठरल्यावर त्याही-बाबत मी नंतर विचारपूस करण्याच्या भानगडींत पडले नाहीं. मी युरोपांत असतांना त्याबाबतचीं बोलणीं चालू झालीं. त्यांत कांहीं अडचणी उद्भवल्याचं मी ऐकलं तें चुकून; अगदीं योगायोगानं. तरीही त्या अडचणी नेमक्या काय तें जाणून घेण्याचा प्रयत्न मी केलाच नाहीं.

मला कल्पना होती ती एवढीच कीं वॉशिंग्टनचा कॉन्स्टिटथुशन हॉल-मधला कार्यक्रम रेंगाळतो आहे, त्याचं निश्चित कांहीं ठरत नाहीं. आणि अगदीं आयत्या वेळीं मला कळलं कीं हॉलचे धनि—डॉटर्स ऑफ द अमेरिकन रेव्होल्युशन ही संस्था—मी नीग्रो म्हणून मला त्या हॉलमध्यें गाऊं द्यायला तयार नाहींत. मला खूप विषाद वाटला. परंतु अखेर धर्माचा आणि सदसद्विवेकाचा विजय होतो ही श्रद्धा असल्यानें मी खचले नाहीं. कांहींतरी मार्ग निघेल असं वाटत राहिलं. तें प्रकरण, त्यानं पुढं धारण केलं तें लढ्याचं स्वरूप धारण करील हें माझ्या स्वप्नांतही नव्हतं.

सान्फ्रान्सिस्कोंत, जाता जाता सहज एका वर्तमानपत्राच्या स्टॉलकडे माझी नजर वळली. तिथल्या पोस्टर्सवर एक मोठी 'हेडलाइन' मी वाचली : **मिसेस रूझवेल्ट यांची ठाम भूमिका.** त्याखालीं लहान अक्षरांत दुसरी ओळ होती : DAR संस्थेंतून बाहेर पडल्या.

DAR म्हणजे 'डॉटर्स ऑफ द अमेरिकन रेव्होल्युशन' ही संस्था. प्रकरण एकूण चिघळलेलं दिसत होतं.

पुढं ठरलेले कार्यक्रम करीत करीत मी पूर्वेकडे येत असता मार्गांत माझं या प्रकरणाबाबतचं मत जाणून घेण्याचा प्रयत्न पत्रप्रतिनिधींकडून झाला. परन्तु मला यांत कांहीं म्हणायचं नव्हतं. हुरोक यांची या प्रकरणाबाबतची भूमिका मला माहीत नव्हती त्यामुळें गप्प रहाणंच इष्ट होतं. हुरोक यांच्या माणसांवर माझा विश्वास होता. ते लोक माझा कार्यक्रम कॉन्स्टिटथुशन हॉलमध्यें व्हावा म्हणून सर्व प्रकारचे प्रयत्न करत असणार हें नक्की होतं. मला मनोमन असंही वाटत होतं कीं माझा कार्यक्रम तिथं होणार.

माझा साथीदार कोस्टी सेण्ट लुईला आजारी पडला आणि दौऱ्यांत माझ्याबरोबर पुढें येऊं शकला नाहीं. माझ्या दृष्टीनें ही समस्या खरी बिकट होती. सेण्ट लुईमध्यें मला साथ करण्यासाठीं फ्रांझ रप या तरुण पिआनिस्टला त्वरेनें आणण्यांत आलं. मी त्याला मागें कधीं पाहिला नव्हता, त्याचं वाजवणं ऐकलेलं नव्हतं. माझ्या खोलींत पिआनो होता.

फ्रांझ येतांच (अद्याप तो माझा साथीदार आहे.) आम्ही तालीम सुरूं केली. त्या गडबडींतही त्याची संथ, शांत वृत्ति पाहून मला बरं वाटलं. हातोहात तो एखाद्या गाण्याची सुरावट अवगत करीत असे. माझं गाणं त्यानं ऐकलेलं होतं. त्या जोरावर त्यानं माझीं अनेक गीतं मला बरींच अचूक वाजवून दाखवलीं.

सेंट लुईचा कार्यक्रम आम्ही पार पाडला आणि पूर्व दिशेनें प्रवास करीत, मध्यंतरी आणखी दोन गांवांतून दोन कार्यक्रम केले. आमचं उद्दिष्ट होतं : वॉशिंग्टन. वॉशिंग्टनचा आमचा कार्यक्रम ठरल्या दिवशीं होईल असं आतां वाटत नव्हतं. पण तिथं कोस्टी एका इस्पितळांत रुग्णशय्येवर होता त्याला भेटणं अवश्य होतं. माझं केवळ वॉशिंग्टनला येणं खळबळजनक ठरेल ही कल्पनाच माझ्या ध्यानीं मनीं नव्हती. मात्र जेव्हां ॲनापोलिसला मि. हुरोक यांचे जनतासंपर्काधिकारी जिरल्ड गूड आमच्या डब्यांत वॉशिंग्टनपर्यंत आमची सोबत करण्यासाठीं चढले तेव्हां कल्पना आली.

वॉशिंग्टनला उतरल्यावर माझ्यावर वृत्तपत्रप्रतिनिधींकडून सवालांचा भडीमार होणार हें निश्चित होतं. वॉशिंग्टन स्टेशनांत ते माझी वाटच पहात असणार होते. या 'हल्ल्या' ला मला तोंड देता यावं म्हणून जिरल्ड गूडनीं माझ्या मनाची पूर्वतयारी चालविली.

स्टेशनांत उतरल्यावर खरोखरच प्रश्नांचा माझ्यावर वर्षाव झाला. वृत्तपत्रप्रतिनिधींनीं धमाल केली. मी त्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. कारण प्रथम मला इस्पितळांत कोस्टीला भेटायचं होतं. मी मोटारींत जाऊन बसले. आमच्या मोटारीमागून वृत्तपत्रप्रतिनिधीहि वेगळ्या मोटारीनें येऊं लागले. इस्पितळांत प्रवेश करतांनाहि पुन्हा मला बराच त्रास झाला. पत्रप्रतिनिधी माझ्यामागून येऊं लागले. त्यांना अडवण्यांत आलं. मी कोस्टीला भेटून परतेपर्यंत ते प्रवेशद्वाराशीं थांबले. पुन्हा एकवार, मी बाहेर पडूं लागतांच त्यांनीं मला वेढून सवालांची सरबत्ती उडवली. त्यांत कोस्टीच्या तब्बेतीपासून वॉशिंग्टनमधल्या कॉन्स्टिटयुशन हॉलमधल्या माझ्या कार्यक्रमापर्यंत अनेक विषयांचा समावेश होता. अखेर कसेबसे आम्ही त्या भडीमारांतून सुटलों आणि न्युयॉर्ककडे गेलों.

मी वॉशिंग्टनमधून जाण्यानेंही कॉन्स्टिटयुशन हॉलमधल्या कार्यक्रमाचं प्रकरण थंडावलं नाहीं. उलट वातावरण जास्तच तापत गेलं. मी जाई तिथें माझा तें पाठपुरावा करूं लागलं. माझे स्नेहीपरिचित मला त्याबद्दल वारंवार विचारूं लागले; आणि अगदीं अपरिचित सुद्धां मुद्दाम भेटून मला त्या प्रकरणाबाबतचीं आपलीं मतं आवेशपूर्वक, तळमळीनें ऐकवूं लागले.

मला काय वाटत होतं? मला खूप वाईट वाटत होतं आणि लाज वाटत होती. ज्यांनीं हें प्रकरण निर्माण केलं, पेटवलं, त्यांनीं समंजसपणाच्या अभावी असं केलं असं मला वाटत होतं. त्यांना व्यक्तिशः मला किंवा माझ्या जमातीची प्रतिनिधि म्हणून मला धडा शिकवायचा असेल; त्याहून महत्त्वाचं हें होतं कीं त्यांची प्रत्यक्ष कृति अत्यंत निर्बुद्ध आणि हीन होती. त्यामुळें उद्भवलेली कटुता शक्य असतं तर मी आनंदानं नाहींशी केली असती. याचा अर्थ असा नव्हे कीं कॉन्स्टिटयुशन हॉलमध्यें इतर गायकांप्रमाणें गाण्याचा मला अधिकार नाहीं असं कबूल करायला मी तयार झाले असते. परंतु तो केवळ माझा व्यक्तिगत प्रश्न असता तर कांहीं ना कांहीं मार्ग मी त्यांतून काढला असता आणि वातावरण निवळवलं असतं. हा मार्ग मला तेव्हां सुचत होता असं नव्हे, आजही तसा कांहीं मार्ग माझ्या मनांत येत नाहीं. परंतु मला अनुभवानें एक कळत होतं कीं जगांत माणसांच्या वेगवेगळया जाती या असायच्याच; आणि माझी जात बेडर आणि झुंजार स्त्रीची नव्हे. लढणं आणि त्यापायीं होईल ती हानी सोसणं हें माझं काम नव्हे.

नंतर असं ठरवण्यांत आलं कीं वॉशिंग्टनमध्यें माझा जाहीर आणि खुला कार्यक्रम 'ईस्टर सण्डे' ला व्हावा. लिंकनच्या स्मारकाच्या स्थळीं हा ठरवण्यांत आला होता. कुणालाही त्याला उपस्थित रहाता येणार होतं. त्याबाबतचं जाहीर आवाहन सरकारच्या अंतर्गत व्यवस्था खात्याचे प्रमुख हॅरॉल्ड एल्. आइक्स यांनीं केलं. त्याला वृत्तपत्रांतून भरपूर प्रसिद्धि देण्यांत आली. जात्या वृत्ती वेगळी असली तरी थोडं फार लढणं अपरिहार्य झालं आहे, हें माझ्या लक्षांत आलं.

तें १९३९ साल होतं. एप्रिलची ९ तारीख हा 'ईस्टर सण्डे' येत

होता. त्यापूर्वी बरेच कार्यक्रम ठरले होते ते मला पार पाडायचे होतेच. जाई तिथें वार्ताहर आणि छायाचित्रकार घेरीत. सारे विचारीत, "वॉशिंग्टनची काय बातमी?" मी सांगे, "मला ती खरोखर फारशी माहीत नाहीं. मी काय सांगूं?" एक खरं कीं कचित् मला कांहीं महत्त्वाची माहिती असेही; परंतु अशा वेळीं गप्प रहाणंच मला मानवे. मुख्यतः 'डॉटर्स ऑफ द अमेरिकन रेव्होल्युशन' या संस्थेविषयीं अवाक्षरही उच्चारण्याचं मी टाळत होते. कांहींतरी बोलून नंतर तें अंगाशीं येण्याचा प्रसंग मला नको होता. त्याला तोंड देण्याची ताकद माझ्यांत नव्हती. माझे व्यवस्थापक त्याबाबत योग्य त्या हालचाली करीत होते आणि तेवढं बस्स होतं.

एखाद्या मौलिक आणि तात्त्विक उद्देशाला कृतीनें कुणाचा पाठिंबा मिळाला कीं दिलासा वाटतो. टेक्सास शहरांतल्या 'डॉटर्स ऑफ द अमेरिकन रेव्होल्युशन' संस्थेच्या सदस्यांनींच माझ्या कार्यक्रमाचीं २०० तिकिटं घेतलीं. याला खूप महत्त्व होतं. एकाद्या विपरीत निर्णयाबाबात सबंध संस्थेला वा गटाला दोष लावण्यांत अर्थ नसतो ही माझी समजूत या घटनेनें दृढावली.

वॉशिंग्टनमधल्या खुल्या कार्यक्रमाची तपशीलवार कल्पना मला आगाऊ देण्यांत आली होती. किंबहुना, मला तो कार्यक्रम पसंत आहे ना, हेंही विचारण्यांत आलं होतं. मी 'हो' म्हणाले, पण तात्काळ नव्हे. विचारांती. देखाव्याची आणि प्रदर्शनाची मुळांत मला नावड होती. शिवाय या घटनेचे परिणाम कुठवर जातील हेंही सांगता येत नव्हतं. मी आत्मशोधन केलं. तत्वतः अशा कार्यक्रमाची कल्पना चांगली होती. एकच कीं व्यक्तिशः मला ती मानवण्याजोगी नव्हती. नंतर असं वाटलं कीं या प्रकरणांत खरोखर व्यक्ती म्हणून मला महत्त्व फार थोडं आहे. इच्छा असो, नसो, मी एवढ्यापुरती माझ्या जमातीची प्रतिनिधि झाले आहे. आणि म्हणून मला हा कार्यक्रम केला पाहिजे—तत्त्वासाठीं. आणि मी होकार दिला.

होकार देण्यापूर्वी आईचाही विचार मी याबाबत अर्थातच घेतला. तिचे उद्गार वैशिष्ट्यपूर्ण होते. ती म्हणाली : "घेशील त्या निर्णयाला

महत्त्व फार मोठं आहे. गाणं हें तुझं क्षेत्र ठरून गेलं आहे. त्यांतच तूं रहाणार. तुझ्या आशाआकांक्षा तुला माहीत. म्हणून तूंच योग्य तो निर्णय घे.''

मी काय निर्णय घेईन याची कल्पना तेव्हां आईला होती. मलाहि मनोमन ती होतीच. परिस्थितीपासून तोंड चुकवून मी पळूं शकत नव्हते. माझ्यांत कांहीं सामर्थ्य असेलच तर त्याचा उपयोग मला आतांच करावा लागणार होता. मी होकार दिला. याचा अर्थ असा नव्हता कीं होकार दिला आणि मनांतलं सारं वादळ जादू झाल्यासारखं शमलं.

ईस्टरच्या भल्या सकाळीं आम्ही वॉशिंग्टनला पोंचलों. पेनिन्सिल्व्हानियाचे माजी गव्हर्नर गिफर्ड पिन्चॉट यांच्या घरीं आम्ही मुक्काम ठेवला. शहरांतल्या हॉटेल्समधून आम्हांला या खेपेस प्रवेश मिळणार नाहीं हें जाणून पिंचॉटनीं आम्हांला आपल्याकडे बोलावलं होतं. त्यांच्याकडे उतरल्यानंतर आम्ही लिंकन मेमोरियलच्या जागीं गेलों. माझ्याबरोबर कोस्टी होता. त्याची तब्येत आतां सुधारली होती. आम्ही तिथल्या पिआनोवर कांहीं गीतांचा धांवता सराव केला.

परत संध्याकाळीं आम्ही तिथं गेलों तेव्हां कांहींतरी अननुभूत अनुभव मी घेत होते. ऊर धडाडत होतं. शब्द उमटत नव्हते, सुचत नव्हते. गाता तरी येईल कीं नाहीं तें सांगता आलं नसतं, इतकी मी गडबडले होते. साल्झबर्गच्या कार्यक्रमाच्या वेळीं मध्यंतरांत जगप्रसिद्ध संगीत-निर्देशक टोस्कॅनिनी भेटायला आले तेव्हां कांहींसं असंच मला झालं होतं.

असंख्य श्रोत्यांच्या कुजबुजण्याचा एकच एक गंभीर नाद कानांवर पडला तशी माझ्या नाडीचे ठोके वाढले. मोटारींतून आम्हांला पोलिसांच्या कड्यांत उतरवून घेण्यांत आलं आणि तसंच एका खोलींत नेण्यांत आलं. सरकारी अंतर्गत-व्यवस्था-प्रमुख मि. आइक्स यांचा परिचय इथं करून देण्यांत आला. त्यांनीं कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली. सूचना मिळतांच मी व्यासपीठाकडे निघाले.

समोरचा अवाढव्य जनसागर पाहून श्वास किंचित्काळ अडला. भानच हरपलं. क्षणभर कांहीं दिसेनासं झालं. नजर पोंचेल तिथपर्यंत

माणसंच माणसं पसरलीं होतीं. त्यांच्या प्रचंड सदिच्छा मला जाणवल्या. त्यांत मी बुडून जाते आहेसं वाटलं. मी गाण्यासाठीं उभी राहिले. राष्ट्रगीतानं कार्यक्रमाला आरंभ करायचा होता. उभी राहिले आणि घसा बंद झालासं वाटलं. गुदमरल्यासारखं झालं. गीताचे शब्द पाठ होते; परंतु क्षणभर वाटलं, ते कधींच उमटणार नाहींत.

मी गायले. कशी, कुणास ठाऊक. वर्षानुवर्षे गात आले होते त्याचा परिणाम उपयोगाला आला असावा. तो गांठीला नसता तर त्या प्रसंगीं गाता येणं अशक्य होतं. मी काय काय गायले तेंही, दुसऱ्या दिवशींच्या वृत्तपत्रीय कात्रणांमुळें माझ्या लक्षांत आलं.

लिंकनच्या स्मारकाच्या इमारतींत छायाचित्रं घेण्याला मनाई होती. दुःखाची गोष्ट अशी कीं, त्या दिवशीं तो नियम मोडण्यांत आला. छायाचित्रं घेण्यांत आलीं. हेंही दुसऱ्या दिवशीं मला समजलं.

कार्यक्रम संपल्यावरही, लोकांची मागणी थांबेना म्हणून मी चार शब्द बोलले, असं वर्तमानपत्रांतल्या बातम्यांवरून दिसतं. माझा यावर कांहीं केल्या विश्वास बसूं शकत नाहीं. मी म्हणाले, (म्हणे.) "मी गहिंवरून गेले आहे. मला बोलवत नाहीं. आपण माझ्याकरता आज जें केलंत त्याचं वर्णन कसं करूं? पण अंतःकरणापासून मी त्याबद्दल फार फार ऋणी आहे."

मी फार सरळ आणि खरं तें बोलले. पण बोलले हें खरं का?

ती घटना, तो सोहळा मी विसरूंच शकत नाहीं. दर वर्षीं 'ईस्टर संडे'ला तो प्रसंग ताजा होतो. मनांतल्या मनांत पुन्हा एकवार घडूं लागतो. एखाद्या कार्यक्रमाला कुणीतरी भेटून सांगतं, "त्या ईस्टर संडेला बाकी कमाल झाली. मी होतों ना त्या वेळीं तिथें." जागोजाग मला त्या घटनेबाबत माहिती असणारीं लहानथोर माणसं आजवर भेटत आलीं आहेत.

पुढें कालांतरानं कॉन्स्टिटयुशन हॉलच्या चालकांचं धोरण बदललं. चीनला सहाय्य म्हणून निधि जमविण्यांत आला त्या निमित्तानं मी त्या

हॉलमध्यें प्रथम गायले. पुन्हा गायले तीहि कुणाच्या तरी मदतीसाठींच. आणि अखेर एकदां स्वतंत्रपणें, सर्वसाधारण कार्यक्रमांत मी तिथं गायले. त्यानंतर वारंवार माझे कार्यक्रम तिथं झाले आहेत. कुणाही नीग्रो गायकाला त्या हॉलमध्यें आज गाता येतं. आतां कुणी बंदी करूं म्हणत नाहीं आणि तेंच चांगलं आहे.

त्या हॉलमध्यें मी प्रथम जाऊन गायले तेव्हांची भावना कुठल्याही प्रकारें विशेष नव्हती हें मुद्दाम सांगते. इतर कुठल्याही हॉलसारखाच तो मला वाटला. तो मला गाण्याच्या दृष्टीनें उत्तम वाटला, आवडला, आणि अगदीं मजेनें मी तिथं गायले. मनांत त्या वेळीं पराक्रमाची, उन्मादाची भावना अणुमात्र नव्हती.

• •

# मिसेस रूझवेल्ट

त्या ‘ऐतिहासिक’ महत्त्वाच्या ईस्टर सण्डेला कांहीं मिसेस रूझवेल्ट मला भेटल्या नाहींत. निदान तिथं त्या भेटल्याचं आतां स्मरत नाहीं. त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांची माझी गांठ पडण्याचा शुभ योग आला. इंग्लंडचे राजे सहावे जॉर्ज राणीसमवेत अमेरिकेला आले होते तेव्हांची गोष्ट. त्यांच्या रंजनासाठीं ज्यांचे कार्यक्रम ठेवण्यांत आले, त्यांतली मी एक होते.

या निमित्तानें प्रेसिडेंटसाहेबांशीं परिचय घडणार याची कल्पना असल्यानें त्यावेळीं प्रेसिडेंटना उद्देशून म्हणण्यासाठीं एक छोटंसं भाषण मी मनाशीं तयार केलं. परंतु जेव्हां आमची भेट झाली तेव्हां प्रथम तेच म्हणाले, “ तुम्ही अगदीं तुमच्या फोटोंतल्यासारख्या दिसतां. ” आणि पाठ केलेलं, बनविलेलं सारं भाषण मनांतून भुर्रदिशीं उडून गेलं. कांहीं एक आठवेना. मी म्हणाले इतकंच, “ गुड ईव्हिनिंग, मिस्टर प्रेसिडेंट. ”

पाहुण्यांसमोरचा कार्यक्रम पार पडल्यावर राजाराणीशीं आमची ओळख करून देण्यांत यायची होती. यासाठीं तयार व्हावं म्हणून मी मिसेस रूझवेल्ट यांच्या खोलींत परत आले. राजाराणीना सामोरं होतांच दरबारी पद्धतीनं नम्र व्हायचं असं मी ठरवलं होतं. चित्रपटांत मी लोक असं करतांना पाहिलं होतं. त्यांत अवघडही कांहीं नव्हतं. तिथल्या तिथं मी त्याचा सराव केला. तितक्यांत बोलावणं आलं. मी गेलं. योगायोग असा कीं, राजाराणीशीं परिचय करून घेणारांच्या रांगेत मीच पहिली होते. ठरल्याप्रमाणें नम्र होतांना मी राणीकडे पहात होते आणि नम्र झाल्यावर पाहिलं तों मी बरीच बाजूला वळले होते आणि राणीला सामोरी नव्हते ! हें कसं घडलं तें माझं मलाही कळलं नाहीं,

आणि पुन्हा मी त्या भानगडींत पडले नाहीं. लागलींच राजेसाहेबांशीं ओळख करून देण्यांत आली तेव्हांसुद्धां नाहीं !

राजेसाहेबांच्या डावीकडे मिसेस रूझवेल्ट उभ्या होत्या. त्यांनीं मग माझा हात हातीं घेऊन म्हटलं, "हाउ डु यु डू."

त्यांच्या माझ्या भेटी त्यानंतर न्युयॉर्क, हाइड पार्क, टोकियो, तेल अव्हिव्ह अशा विविध ठिकाणीं घडल्या. अनेक वर्षांमागें, मी जपानांत असतांना मला कळलं कीं मिसेस रूझवेल्ट यायच्या आहेत. जपानभर त्यांचं थाटाचं स्वागत होणार हें मला माहीत होतं. तरी पण मीहि एक फुलांचा झेला खरीदून त्यांना नजर करावा असं ठरवलं. म्हणून इंपीरिअल हॉटेलच्या लॉबीकडे गेले. तों मिसेस रूझवेल्ट समोर येऊन उभ्या राहिल्या ! ठरल्या वेळे आधींच त्या येऊन पोंचल्या होत्या. "काय हो," त्यांनीं नेहमींच्या उल्हासानें विचारलं, "तुम्ही कधींपासून आहांत इथं ?"

"सध्यां जपानमध्यें माझे कार्यक्रम चालले आहेत." मी म्हणाले.

"मग टोकियोंत कधीं आहे तुमचा कार्यक्रम ?"

"आजच रात्रीं." मी उत्तर दिलं.

त्या त्यांच्याबरोबरच्या माणसांकडे वळून विचारूं लागल्या, "या मारिअन अँडर्सनचा कार्यक्रम मी आज रात्रीं ऐकूं शकेन का ?"

माझ्या कार्यक्रमाला त्यांना उपस्थित रहाता यावं म्हणून त्यांच्या ठरलेल्या वेळापत्रकांत काय काय उलथापालथी झाल्या तें कळायला मार्ग नाहीं; परंतु त्या रात्रीं त्या माझं गाणं ऐकायला हजर होत्या. दुसऱ्यांदा त्या माझं गाणं ऐकत होत्या. पहिली खेप लिंकन्स मेमोरियलमधल्या कार्यक्रमावेळची.

अगदीं अलिअलिकडे मी इस्रायलमध्यें गेले असतांना मिसेस रूझवेल्ट तिथं होत्या. तेलअव्हिव्हमधल्या एकाच हॉटेलांत आमचे मुक्काम असणार होते. मी येण्यापूर्वीं त्यांनीं हॉटेलमध्यें निरोप ठेवला होता कीं, मी येतांच त्यांना त्याची वर्दी मिळावी. त्याप्रमाणें आम्ही भेटलों आणि मग त्या त्यांच्या फिरतीवर पुढें निघून गेल्या.

मला भेटलेल्या कांहीं आदरणीय व्यक्तींत मी त्यांची गणना करते. त्यांना ज्या गोष्टींबाबत बोलण्याचे प्रसंग येतात, ज्या गोष्टींशीं त्यांचा संबंध येतो, त्यांच्याबाबत साग्रसंगीत माहिती करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कुठल्याही घटकेला त्या सामान बांधून प्रवासाला तयार असतात. जातील तिथें त्या नांव मिळवतात, त्यांचं म्हणणं पटवून देतात. त्यांचीं कांहीं मोठीं पुण्यकृत्यं, जगाला माहीतही नाहींत, इतक्या गुप्तपणें, प्रसिद्धीविन्मुखपणें पार पडलीं असल्याचा माझा कयास आहे. माझ्यावर तर त्यांचं फार मोठं ऋण आहे.

एकदां एका सभागृहाच्या 'आर्टिस्ट रूम'मध्यें मी असतांना त्या गृहाच्या व्यवस्थापकानं येऊन मला अत्यंत उत्साहानं सांगितलं कीं, दोन दिवसांनीं मिसेस रूझवेल्ट त्या खोलींत असणार आहेत. ती खोली खाली करतांना, न रहाववून, तिच्यांतल्या आरशावर मी साबणाच्या तुकड्यानं मिसेस रूझवेल्टना अभिवादन लिहून ठेवलं.

• •

## माझीं गाणीं

संबंध कार्यक्रम स्वतःला ठेवून गाणं सोपं नव्हे. एक तर गाणीं कुठलीं म्हणावींत आणि कुठलीं म्हणूं नयेत हें ठरवणं कठीण होतं. मोठ्या वस्त्रागारांतून नेमकीं वस्त्रं निवडण्याइतकं तें कठीण आहे. मोठं वस्त्रागार फार थोड्यांना उपलब्ध असतं. परंतु गायकाला मात्र नेहमींच असंख्य गीतं उपलब्ध असतात.

या निवडीसाठीं मुख्यतः समोरच्या श्रोतृसमुदायाचा विचार करावा लागतो. श्रोतृसमुदाय म्हणजे असंख्य श्रोते. कुणाला शास्त्राची जाण तर कुणाला केवळ गाण्याचा कान. पहिल्या प्रकारच्या श्रोत्यांना शास्त्रशुद्धता हवी तर दुसऱ्या प्रकारच्या श्रोत्यांना प्रथम हवं मनरंजन. शास्त्र त्यांना समजत नाहीं. या दोन्ही वर्गांसाठीं मी गाण्याची कोशिस करते. आणि त्याच वेळीं, माझ्या आवडीचा कटाक्ष त्यांत असतोच.

एकादं गीत उपस्थित लोकांना आवडलं म्हणून त्याचा अतिरेक करून चालत नाहीं. एक प्रसंग आठवतो. ओस्लोमध्यें 'Crucifixion' मी म्हटलं. माझ्या माहितींत याहून भावनोत्कट भक्तिगीत दुसरं नाहीं. त्याच्या साध्या रचनेनं, सुरेख चालीनं, ख्रिस्ताच्या अखेरीची सारी भयावहता आणि कारुण्य आपल्याला प्रतीत होतं. त्या दिवशीं तें गातांना तें मला पुरेपूर जाणवलं. गाता गाता डोळे तुडुंब भरले. श्रोत्यांतहि गहिंवर दाटला होता. गीत पुरं झाल्यावर टाळयांच्या सौम्य गजर चालू झाला, तो संपेना. मला दुसरं गीत सुरूं करता येईना. म्हणून पुन्हा मी तेंच गीत गायले. दुसऱ्या वेळीं तें मला पहिल्या वेळेसारखं वाटलं नाहीं. माझं समाधान झालं नाहीं. एका समीक्षकानं आपल्या समीक्षणांत नंतर म्हटलं, कीं तें गीत मी पुन्हा गायला नको होतं. त्याचं

८५०३

म्हणणं योग्य होतं. असा एक क्षण येतो, कांहीं क्षण येतात, कीं जेव्हां तुम्ही तुमचे रहात नाहीं आणि कांहीं विशेष करून जातां. अशा वेळीं माणसानं हावरट होता नये. जास्त मिळविण्याची अपेक्षा करूं नये.

आणखी एकदां अशीच Trampin' हें भक्तिगीत गातांना माझे डोळे भरले होते. अमेरिकेंतल्या एका कार्यक्रमांतली ती गोष्ट. त्या गीतांतल्या पंक्ती अशा आहेत :

"I'm trampin,' I'm trampin,'
I'm trying to make Heaven my home.
I've never been to Heaven but I've been told
that the streets up there are paved with gold...

(वाट तुडवतों आहे, मी सारखी वाट तुडवतों आहे, स्वर्ग माझा व्हावा म्हणून ही अखंड वणवण. मी कधीं स्वर्ग पाहिला नाहीं, पण म्हणतात, तिथल्या वाटा सोन्यानं मढवल्या आहेत... )

हें गीत गातांना त्या रात्रीं माझ्या नजरेपुढं थकल्या भागल्या, विकल माणसांच्या पलटणीच्या पलटणी, गळणारे पाय सावरीत कशीबशी वाट-चाल करतांना दिसूं लागल्या. साऱ्यांना एकच आशाः स्वर्ग दिसेल. देव भेटेल. कधीं पाहिलं नाहीं तें पहायला मिळेल, भोगलं नाहीं तें उपभोगा-यला मिळेल. चला पुढें...रेटा पावलं...तुडवा धूळ...पुढें...असंच...

एवढी विलक्षण भावनावश मी कशी झाले, कां झाले, कुणास ठाऊक. पण झाले खरी. असं होतं तेव्हां तुम्ही विचक्षणांनाही जिंकून जातां. चिकित्सेपलिकडे पोंचतां. माणसं रडतात, मुग्ध होतात. बेभान होतात. तुम्ही पहातां तेंच तीं पाहूं लागतात.

कुठल्याही गायकाचीं कांहीं आवडतीं गीतं असतात. मला आवडणारीं गीतं, 'Ave Maria,' 'Begrussung,' 'Komm, Susser Tod,' 'Es ist voll bracht,' 'Crucifixion' आणि सर्वांत आवडतं म्हणजे 'He Has the whole world in His hands' हें भक्तिपर गीत. मारिअन कर्ब्रोनीं मला हें गीत माहीत करून दिलं. या बाईंचा छंद नीग्रो आणि आदिवासी जमातींतलीं गीतं जमवणं हाच आहे.

या गीताला चाल हॅमिल्टन फॉरेस्ट या इंग्लिश पिआनोवादकांनीं लावली. शब्द आणि सूर यांचा इतका आदर्श संगम दुसरा नसेल. इंग्लिश न कळणाऱ्या श्रोतृसमुदायांसमोरहि हें गीत मला दोनदोनदां गावं लागलं आहे, यावरून कल्पना करा.

या गीताची कल्पना अशी : प्रत्येकाच्या सत्त्वपरीक्षेची वेळ केव्हां ना केव्हां येतेच, हें कुणी विसरता कामा नये. अशा कठिण वेळीं सहाय्याला येणारी एक अदृश्य शक्ति जागी आहे. तिच्यापाशीं भेदाभेद नाहींत. सगळ्यांना तिच्यापुढं सारखं स्थान. वर्षा आणि वात तिच्या अस्तित्वाचीं, सामर्थ्याचीं चिरंतन चिन्हं. पावसाची धार गरीब, श्रीमंत, असा भेद करीत नाहीं. तिला कोणी रोखूं शकत नाहीं, कुणी खेंचूं, बंदिस्त करूं शकत नाहीं. ती देवाघरची देणगी. गीत म्हणतं, " He's got the wind and the rain in His hands. He's got the whole world in His hands..." (वर्षा आणि वात त्याच्या हातीं, सारं जीवन त्याच्या हातीं...) पुढें हें गीत सांगतं, " He's got the lying man. He's got the gambling man, He's got the crap-shooting man in His hands." (वाचेचा खोटा, हाताचा जुगारी, वृत्तीचा शिकारी, सारीं माणसं त्याचीं.) हे झाले पापी लोक. यांच्या बरोबरीनें गीतांत 'कुक्कुल्या बाळा'चा समावेश आहे. गीतांत सवाल आहे, " Who will protect them when mother and father can't ? " (आईवडील असहाय होतात तेव्हां या इवलाल्या जीवांवर कोण छाया धरतं ?) पुढें गीत म्हणतं, " He's got you and me, brother, in His hands. He's got everybody here in His hands. He's got the whole world in His hands." (गड्या, अरे, तूं, मी, सारे त्याच्याच हातीं. हें सारं विश्व त्याच्या हातीं...)

हें सारं या गीतांत होतं. श्रोत्यांच्या पसंतीला उतरेल म्हणून तर मी तें निवडलंच. पण शिवाय त्यांत माझ्या दृष्टीनें एक हांक होती, याचना होती, आत्मार्पणता होती. आणि शिवाय सुंदर साधेपणा होता. माझ्या दृष्टीनें, माझ्या कार्यक्रमांतलं एक गीत, याहून त्याला अधिक अर्थ होता.

● ●

# फिरती

पुढच्या सीझनमधल्या कार्यक्रमांचं आगाऊ वेळापत्रक हातीं येतांच मी माझ्या कपड्यांचा विचार करूं लागले. कपडे, चांगले कपडे, आकर्षक आणि नीटनेटके कपडे हा जणूं आमच्या व्यवसायाचा गणवेष. आपल्याकडून शक्य तेवढं चांगलं दिसण्याचा प्रयत्न प्रत्येक गायक कलावंत करीत असतो.

मी ' ग्लॅमर गर्ल ' नाहीं, खुबसूरत नाहीं हें मला कुणी सांगण्याची आवश्यकता नाहीं. तशी कुणी नाहीं हें लक्षांत ठेवूनच मी माझे पोषाख निवडते. मला शोभतील असे पोषाख मी निवडते. माझा पोषाख अंगाला सहज बसणारा आणि भार न होणारा असावा असा माझा कटाक्ष असतो. कार्यक्रमांत गातांना मला त्याची डांचती जाणीव होता कामा नये हा यामागला हेतु असतो. रंग, आकार, याबाबतही माझे कांहीं कटाक्ष असतात. भडक रंग मला खपत नाहींत. डोळयाला दिपविण्यासारखं माझ्याकडे कांहीं नाहीं आणि म्हणून कपड्यांतही तसं असता कामा नये अशी माझी इच्छा असते.

माझे सारे पोषाख मिळून पन्नासहून अधिक भरतील. कुठें कुठें ते काळजीपूर्वक ठेवलेले आहेत. कधीं सारे एकदां पहाता आले तर त्यांतले अनेक मी न कचरता कुणाला ना कुणाला देऊन टाकीन. याबाबत आमचं घर बांधलं जात असता माझे यजमान एकदां म्हणाले होते, "तुझ्या साऱ्या कपड्यांभोंवती त्या मापानं घर बांधलं जायचं झालं तर तें शक्य नाहीं, हें तुला माहीत आहे कीं नाहीं ?"

एका पोषाखाला मी जास्तींत जास्त म्हणजे ८२५ डॉलर्स दिले आहेत. तो बनविणारांचे परिश्रम त्या किंमतीचे होते यांत वाद

नाहीं. तरीही पोषाखासाठीं एवढी रक्कम मला नेहमींच भारी वाटत आली आहे. आपण उधळपट्टी केली ही जाणीव जात नाहीं.

गेलीं वर्षानुवर्षं मी कार्यक्रम करीत आहे. त्यांची नोंद कुठें ठेवलेली नाहीं, परंतु ती संख्या सहज हजारावर भरेल. मैलांच्या संख्येंत फिरतीचा हिशेब केला तर लाखों मैलांची गणती करावी लागेल. यांतल्या हजारों मैलांसाठीं दोन निष्ठावंत जोडीदार मला लाभले आहेत. मला साथ करणारे फ्रांझ रप् आणि मि. हुरोक यांचे प्रतिनिधि इस्साक अलेक्झँडर जोफ् हे ते दोघे होत. १९४७ त कोस्टी व्हेहॅनेन फिन्लंडला परत गेल्यावर फ्रांझ रप् यांना मी तिघां गुणी अर्जदारांतून साथीसाठीं निवडलं.

गाडींत, प्रवासांत, आमच्या मोकळ्या, प्रदीर्घ गप्पा होतात. जोफ्ला माझा एकादा कार्यक्रम टाकाऊ वाटला असेल तर तसं तो प्रवासांत मोकळेपणानें सांगून टाकतो. छापील समीक्षणांबाबत आम्हां तिघांचं एकमत कधींच होत नाहीं; वाद झडतात. माझ्यापेक्षां वादाला ते अधिक हपापलेले असतात हें मला इथं कबूल केलं पाहिजे. केवळ संगीतावरच ते चर्चा करीत नाहींत; ते राजकारण बोलतात, अर्थशास्त्र बोलतात, साहित्यावर विचारविनीमय करतात, काय वाटेल त्यावर त्याचा व्यासंग असतो. दोघेही बडबडे आहेत, कुशाग्र बुद्धीचे आहेत, हजरजबाबी आहेत.

कालमानानें माझा श्रोतृवर्ग बदलत गेला आहे. प्रथम प्रथम सारे काळ्या कातडीचे माझे बांधव माझे श्रोते होते. पुढें बहुसंख्य श्रोते गौरवर्णीय दिसत. 'कन्सर्ट कोर्सेस' म्हणून गायनाच्या कार्यक्रमांची एक माला आमच्याकडे आंखून आगाऊ जाहीर केली जाई. तिकीट–विक्रीही आगाऊ होई. त्यांत मी गाऊं लागले होते. दक्षिणेकडल्या कांहीं शहरांतून नीग्रो लोकांना माझ्या कार्यक्रमाची आगाऊ कल्पना देण्यांत येत नसे. आयत्या वेळीं ती येतांच ते तिकिटांसाठीं धांवत परंतु तीं उपलब्ध नसत. शिवाय सभागृहाच्या एका मर्यादित भागांतच त्यांच्यासाठीं बसण्याची व्यवस्था केली जाई; तो भाग भरतांच जास्त व्यवस्था शक्य होत नसे.

अशी वेगवेगळी व्यवस्था असलेल्या सभागृहांतून गाण्याला मला केव्हांही समाधान वाटलं नाहीं. गेल्या कांहीं वर्षांपासून तर मी ठरवूनच टाकलं आहे कीं अशा ठिकाणीं गायचंच नाहीं.

अगदीं पूर्वींच्या जुन्या काळांत देखील गाण्याच्या व्यासपीठावर वा त्यामागें वर्णभेद अस्तित्वांत नव्हता. कुणालाही स्वाक्षरीसाठीं येऊन गायकाला गांठतां येई, आणि कुठलीही कटुता उद्भवत नसे. एकच वेगळा, गोंधळवणारा मासला आठवतो : एक गौरवर्णीय बाई एकदां इतरांबरोबर व्यासपीठामागें आली होती. इतर सारे माझ्या स्वाक्षऱ्या घेईतोंवर ती एका बाजूला उभी होती. ते सारे गेल्यावर ती आंबट चेहऱ्यानें, अळें बळें पुढें झाली. म्हणाली, "हें पहा, इथवर आतां मी आलेंच आहे तर घेते तुमची स्वाक्षरी. द्या."

स्थळप्रत.
अनुक्रम 22200 दि.
क्रमांक 7e0 नों: दि:

# पूर्व आणि पश्चिम

तुमचं दैव जोरावर असेल तर तुम्हांला मागणी असते; थोडं फार जग पहायला मिळतं. वागावं कसं तें कळतं. तुम्ही लवचिक होतां. कारण प्रत्येक देशांतल्या वागण्याच्या पद्धति वेगवेगळ्या असतात.

अलिकडल्या काळांत दोन स्थळं माझ्या स्मरणांत चांगलीं राहिलीं आहेत. जपान आणि इस्रायल हीं तीं दोन स्थळं. दोन देशांत केवढा फरक. लोकांचीं रंगरूपं किती वेगळीं. चालीरीती, शिष्टाचार, साऱ्यांत भरपूर फरक, अगदीं विरोध. तरीही संगीताविषयींची दोन्ही देशांतल्या लोकांची ओढ सारखीच. आंच सारखीच.

टोकियोच्या विमानतळावर लोकांच्या जमावानं आमचं स्वागत केलं. प्रथम वाटलं, कुणी बडी असामी यायची असावी आणि तिच्या स्वागतार्थ हे लोक जमले असावेत. परंतु मग कळलं कीं हें आमचंच स्वागत आहे ! त्यांत माझ्या कार्यक्रमांची नियोजक जॅप्नीज ब्रॉडकास्टिंग कंपनी हिचे प्रतिनिधी होते, अमेरिकन वकिलातीचीं माणसं होतीं, आणखीही कुणी होते.

राजवाड्यावरून आम्हांला बोलावणं आलं. तिथं राणीसाठीं मी गायले. चार पांच जर्मन गीतं मी म्हटलीं. 'Ave Maria' म्हटलं. आणि माझ्या पद्धतीप्रमाणें कांहीं भक्तिगीतं. गाणं संपलं; राणी निघून गेली. आम्हांला वेगळ्या दालनांत नेण्यांत आलं. तिथं राणीसाहेबांनीं आम्हांला व्यक्तिगत भेट दिली. आमच्या दौऱ्याविषयीं, जपानविषयींच्या आमच्या प्रतिक्रियांविषयीं त्यांनीं चौकशी केली. कांहीं भेटी आम्हांला दिल्या. 'नो' पद्धतीच्या नर्तिकेची एक हातीं कोरलेली सुंदर मूर्ति मला मिळाली.

' नो ' हा जपानचा पुरातन नृत्यप्रकार आहे. फूटभर उंच, बारीक बारीक कोरलेली, हातीं पंखा, चेहऱ्यावर मुखवटा, अशी ही कापराच्या लांकडाची सुंदर, रंगीत मूर्ति मी जपून ठेवली आहे. फ्रांझला खूप कोरलेली लाखेची एक पेटी मिळाली.

राणीला भेटून निघतों तों आमच्या भेटी सुंदर वेष्टनांत व्यवस्थितपणें बांधून सज्ज होत्या. जुन्या काळच्या दरबारी सोहळ्यासारखं सारं झालं. हा प्रसंग माझ्या मनावर कायमचा कोरला गेला आहे. बऱ्याच बाबतींत जपान कितीही पाश्चात्त्य वळणावर गेला असला तरी जुनी परंपरा तिथें कायम आहे.

इस्रायलमध्यें एक नवी परंपरा जन्म घेत असल्याचं मला प्रतीत झालं. तिथले श्रोते कांहीं विशेष वाटले. स्वतःचा देश हवा म्हणून कोठकोठून त्या भूमीवर जमलेले ते सारे लोक होते. आणि संगीताविषयींची त्यांची भूक विलक्षण होती. त्यांतही दोन शेतकी केंद्रांची आठवण कायमची राहिली आहे. मूळची ओसाड जमीन या केंद्रांवर रहाणाऱ्या लोकांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक कसविली होती. तिच्यांतून भरघोस पिकं काढलीं होतीं.

या केंद्रांवर, संगीतावर नेहमींच विशेष भर देण्यांत येई. मुलांच्या विकासाकडेही या केंद्रांवर फार लक्ष पुरविण्यांत येई. आपलीं मुलं सुखांत वाढावींत म्हणून वाटेल तेवढा घाम गाळण्याची, रक्त आटविण्याची इथल्या माणसांची तयारी दिसली. त्याचबरोबर मुलांना लाडावण्याचीही प्रवृत्ति नव्हती. तीं पुरेशीं मोठीं होतांच त्यांच्याजोगीं कामं त्यांना नेमून देण्यांत येत; तीं करवून घेण्यांत येत.

येरुशलेमला मी मुद्दाम जाऊन आले. माझ्याबरोबर इंग्लिश बोलणारीं कांहीं माणसं होतीं. गंमत म्हणजे आमच्यांतली प्रमुख व्यक्ति होती फिलाडेल्फियाचे धर्मगुरू फादर पॅट्रिक. आणखीही अनेक स्थळं मी पाहिलीं. जॉर्डन नदीशीं जातांच एका भक्तिगीताचा एक चरण आठवला. “The River Jordan is so wide, I do’nt know how to get to the other side.” (जॉर्डन नदी इतकी रुंद कीं पैलतीराला जावं कसं, कळत नाहीं...)

नदीचं पात्र प्रत्यक्षांत अगदीं निरुंद आणि चिखलानं भरलेलं होतं. माझा अपेक्षाभंग झाला. जेरिकोच्या भिंती पाहिल्या आणि चरण आठवले : " Joshua fit the battle of Jericho, and the walls came tumbling down." ( जोशुआ जेरिकोची लढाई लढला आणि भिंती धडाडा खालीं कोसळल्या. ) मी पाहिल्या त्या भिंती मोठ्याशा उंच नव्हत्या. मात्र पुराणवस्तुसंशोधकांनीं कांहीं ठिकाणीं उत्खनन केलं होतं, तें पाहिल्यावर हें पटलं कीं मुळांत खरोखरच भिंती तशा उंचच असल्या पाहिजेत.

हें सर्व पहातांना एक लक्षांत आलं कीं आमच्या नीग्रो भक्तिगीतांतल्या प्रतिमा थोड्या फार अतिशयोक्तच आहेत. आणि मग मी त्याचीं कारणं शोधूं लागले. एक म्हणजे नीग्रो माणूस परिस्थितीखालीं सदा चिरडलेला. म्हणूनच कल्पनेनें मुक्ततेचीं, स्वैरतेचीं, उत्तुंगतेचीं स्वप्नं पहाणारा. संगीतांत स्वतःचीं दुःखं विसरणारा. म्हणूनच हीं स्वप्नं शब्दांत, सुरांत त्यानें गुंफलीं आणि हीं गुंफू पहातांना त्याला त्याच्या धार्मिक परंपरेमुळें सहाजिकच बायबलमधलीं प्रतीकं सुचलीं. उदाहरणार्थ: जॉर्डन नदी हें विस्तीर्णतेचं प्रतीक. जेरिकोच्या भिंती हें उंचीचं प्रतीक. कांहीं संकुचित, निरुंद, खुजं असं त्याच्या कल्पनेंत त्याला दिसूंच शकत नव्हतं कारण त्याचं दैनंदिन जीवन असं होतं. दैनंदिन जीवनांत गौरवर्णीयां-कडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष पारध चालली होती आणि म्हणून जिथं त्याला कुणी वेगळं वागवणार नव्हतं, हीन वागवणूक देणार नव्हतं, तुच्छ म्हणून पहाणार नव्हतं, मनाई करणार नव्हतं कीं घालवून देणार नव्हतं, अशी एक प्रेममय, शांतिमय, समृद्ध जागा त्यानं कल्पिली. ती : स्वर्ग.

हें सर्व प्रतीत होतांच इस्रायलमधल्या प्रत्येक जागीं मला नवीन आशय दिसूं लागला. अंतर्बाह्य मी गदगदूं लागले. मी पहात होते हें सर्व प्रत्यक्ष न पहातांच माझ्या बांधवांनीं कल्पनेनं तें रंगविलं होतं आणि त्याद्वारें मानवतेच्या उरांत ठुसठुसणारा एक चिरंतन आशय जीव ओतून व्यक्तविला होता.

● ●

## श्रोते, चहाते

सार्वजनिक कार्यक्रम करणाऱ्या आम्ह. कलावंतांचा एक फायदा असा कीं खूप नवनवीन, अज्ञात चहाते निर्माण होतात. कांहीं वेळां यांतून स्नेहसंबंधही जन्म घेतात. कार्नेजी हॉलमधल्या एका कार्यक्रमाच्या वेळीं हळव्या मुद्रेचे, शुभ्र केसांचे एक गृहस्थ आंत आले. ते होते आल्बर्ट आइन्स्टीन. त्यांचं बोलणं हळूवार आणि खूप समजदारपणाचं होतं. ते गेल्यावरही क्षुद्रतेची, लीनतेची एक भावना मन व्यापून राहिली होती.

श्रोत्यांचा एकाद्या गायकाशीं तीन तऱ्हांनीं संबंध येतो. सभागृहांत, व्यासपीठामागें, आणि टपालमार्गें. आपलीं मतं निर्भीडपणें व्यक्त करणारीं पत्रं प्रत्येक गायकाला येतात. अनेक पत्रांतून आर्थिक सहाय्याची मागणी असते. घरासाठीं, व्यवसायासाठीं, चर्चेच्या दुरुस्तीसाठीं, शिवण्याच्या यंत्रासाठीं, फोनचीं बिलं चुकतीं करण्यासाठीं, आणखीहि अनेक कारणांसाठीं लोक पैसे मागतात. मागण्यामागची त्यांची भावना जाणून मला नेहमीं असं वाटतं कीं या साऱ्यांना मला कांहीं ना कांहीं देता यावं. परंतु तें प्रत्यक्षांत शक्य नसतं. मी कितीहि पैसे मिळवले तरी ते या सर्वांसाठीं पुरे पडणार नाहींत. एकदां एका संस्थेकडून मला एक पत्र आलं होतं. "आम्हांला आतां फक्त बारा हजार डॉलर्सची जरूर उरली आहे. तुम्ही तेवढ्या रकमेचा चेक कृपा करून पाठवाल का?" असलं कांहीं मला करता येतं तर मोठी मजा झाली असती. कुणी मागण्याचीही जरूर मग उद्भवली नसती.

कांहीं पत्रं आवाज कमावण्याची, राखण्याची नवी अभिनव पद्धत शोधलेल्यांचीं असतात. कांहीं पत्रं तरुण होतकरू गायकांकडून सल्ला विचार-

ण्यासाठीं येतात. कांहीं पत्रं गाणाऱ्या बऱ्याच वयस्क परंतु (त्यांच्याच मतें) उपेक्षित गायकांकडलीं असतात. त्यांना एकादा 'चान्स हवा' असतो. अशा एका पत्रांत म्हटलेलं माझ्या स्मरणांत आहे: "तुम्ही पोंचलांत. आतां आम्हांला न्या."

कांहीं कांहीं पत्रं भावना हलविणारीं असतात. जवळचं कुणी प्रिय माणूस हरपलेल्या एका स्त्रीनं मला लिहिलं होतं, "तुमच्याकडून उत्तर न आलं तरी चालेल. पण कळवावंसं वाटलं कीं माझ्या दुःखांत तुमच्या गाण्यांच्या रेकॉर्डस्‌नीं जरा विरंगुळा वाटला, बरं वाटलं." असं कुणी भावना ओतून लिहितं तेव्हां वाटतं, हवं तें मिळालं आपल्याला!

परंतु व्यक्ति तितक्या प्रकृति हेंही खरंच. तुम्हांला आत्मसंतुष्ट होऊं न देणारीं कांहीं माणसं असतात. एका कार्यक्रमाच्या वेळीं जोफनें प्रत्यक्ष पाहिलेला एक प्रसंग मुद्दाम आंत येऊन सांगितला. एक जोडपं भर कार्यक्रमांत जागेवरून उठून निघून गेलं होतं. मुलगी खूप चिडलेली दिसली. तिच्या पाठीमागून तिचा जोडीदार गेला होता. दाराशीं दोघं पोंचतात तों त्या मुलीनं हातांतली कार्यक्रम-पत्रिका उद्वेगानं जमिनीवर फेकली. तिला काय वाटलं तें समजण्यासारखं होतं. माझं गाणं तिला आवडलं नव्हतं. तिला तें भिकार वाटलं होतं.

तुमचे श्रोते तुमच्याबाबत आपुलकी आणि उत्सुकता बाळगून आहेत ही भावना सुखाची असली तरी, मला सतत येणाऱ्या पत्रांनीं मात्र मला गोंधळून जायला होतं. इच्छा असते प्रत्येकाला उत्तरं लिहिण्याची, परन्तु लिहिण्याचा मला मनस्वी कंटाळा. कांहीं वेळा मग माझे यजमान उत्तरं लिहितात; अलिकडे माझ्या बहिणींनींहि या कार्यांत वांटा उचलला आहे. मी एकादी कायम स्वरूपाची सेक्रेटरी ठेवलेली नाहीं; फार पत्रं सांठलीं कीं मात्र तात्पुरतं कुणाला बोलवून मी पत्रांना उत्तरं पाठवून देते.

लोक मोठे गंमतीशीर असतात. त्यांच्या औदार्यालाही सीमा नाहीं. कुणी तिकिटं काढून गाणं तर ऐकतातच; पण घरीं जाऊन मला भेटी पाठवतात. त्यांना हा खर्च थोडा होत नसेल आणि मलाही या भेटींचं कौतुक भारी वाटतं. कॅनडांत गेले असतांना एक बाई हॉलवर आली

आणि तिनं स्वतः बनविलेली एक सुरेख बाहुली मला देऊन निघून गेली. फार मन लावून ती बनविलेली दिसत होती. मग कळलं कीं ती बाई आजारी होती; डॉक्टरांनीं तिला असलं कांहीं न करण्याचा सल्ला दिला होता, तो न जुमानता ती येऊन गेली होती! असेच, हातीं भरलेले रुमाल मला अज्ञात व्यक्तींकडून नेहमीं भेट येतात. एक पिसांचा पंखा एकीनं पाठवला होता. तिच्या मुलाच्या अखेरच्या काळांत माझ्या गाण्यांच्या रेकॉर्ड्सनीं त्याला फार हलकं वाटलं असं तिनं लिहलं होतं. कुणी चित्रकलेंतलीं माणसं कार्यक्रमाचीं रेखाचित्रं पाठवतात. कुणी छोटं छोटं जवाहिर आणून देतात. दुर्मीळ वस्तूही अनेकदां येतात. एकीनं एक सुंदरशी जुनी पिन पाठवून सोबत लिहिलं होतं, "हिला तशी किंमत नाहीं. पण माझ्या आईची ही फार आवडती होती. तुमच्या आईला ही वापरायला सांगा."

श्रोतृसमुदायांबाबत लिहिते तेव्हां कांहीं कार्यक्रमांच्या आठवणी प्रकर्षानं येतात. त्यांत दुसऱ्या महायुद्धाच्या काळांतल्या फार आहेत. या काळांत इस्पितळांतून, लष्करी तळांवर मी गायले, त्याच्या या आठवणी. एकाद्या इस्पितळांत तर पिआनोशिवाय मला गावं लागलं आहे. कन्सास-मधल्या टोपेका शहरीं, जखमी वीरांसाठीं माझं गाणं झालं. मला आगाऊच कल्पना देण्यांत आली होती कीं पंधरा मिनिटांहून अधिक काळ बसून गाणं ऐकणं त्यांना शक्य होणार नाहीं. गाणं सुरूं झाल्यावर जवळ जवळ पाऊण तास मी गात होते आणि ते लोक ऐकत होते. कार्यक्रम संपला तेव्हां खूप बरं वाटत होतं.

टेक्सासमधल्या एका इस्पितळांत, माझ्या गाण्यानंतर, युद्धांत दोन्ही पाय गमावलेला एक तरुण मुलगा मला म्हणाला, "लौकरच मला कृत्रिम पाय देतील. मी मग डल्लासला माझ्या घरीं जाणार. तिथं कधीं येतां का तुम्ही?"

"हो." मी म्हणाले. "येते."

"मग मी नक्की तुमच्या गाण्याला येईन आणि तुम्हांला भेटेन."

तसा तो आला, हें विशेष.

कोरियांत मी गायले. इचॉन नजीक नांगरलेल्या हॉस्पिटलशिपवर, तसंच कोरियन प्रजासत्ताकाच्या सैनिकांसाठीं चालविण्यांत आलेल्या खुद्द इचॉनमधल्या इस्पितळांत माझे कार्यक्रम झाले. एका ठिकाणीं पिआनो-ऐवजीं पायपेटी होती; तिच्याच साथीनें मी गायले. फ्रांझ रप्नेंच उत्साह-पूर्वक साथ केली. कार्यक्रम संपला तेव्हां तो म्हणाला, "आजच्या कार्य-क्रमांत मी दहा मैल चाललों!"

अमेरिकेंत 'वॅक' संघटनेच्या सदस्यांसाठीं मी ऑगलथॉर्प इथं गायले. विमानदलाच्या कांहीं समारंभानिमित्त शेपर्ड एअर फोर्स बेसवर माझा कार्यक्रम झाला. तो कार्यक्रमही संस्मरणीय आहे. खरा आमचा कार्यक्रम सॅन ॲण्टॉनियोला ठरला होता. तिथं गेल्यावर सांगण्यांत आलं कीं विमान-तळावर मी गायचं होतं. विमानानं आम्हांला तिथं नेण्यांत आलं. फ्रांझ मात्र मोटारनें आला.

विमानांत मी आणि जोफ अशीं दोघं होतों. आमच्याबरोबर त्या समारंभाची व्यवस्था करणाऱ्या, तळ–प्रमुखाच्या पत्नी, मिसेस ब्लॅक या होत्या. प्रथम विमान इतकं लहान वाटलं कीं त्यांत आम्ही मावणार कशीं असाच प्रश्न मला पडला. तरी पण आम्ही मावलों. मी, जोफ, मिसेस ब्लॅक आणि स्वतः वैमानिक. वैमानिकाच्या शेजारीं मिसेस ब्लॅक बसल्या होत्या.

आपल्या शेजारीं ही बाई आहे या कल्पनेनेंच त्या तरुण वैमानिकाला एवढं हरखल्यागत झालं होतं कीं मधून मधून सारखे त्याचे हात विमानाच्या 'कंट्रोल्स' वर रहात नसत. त्याची बडबड तर एकसारखी चालली होती. तें पाहून मला कसं तरी होत होतं. 'वॅको 'शीं आमचं विमान तेल भरून घेण्यासाठीं उतरलं तेव्हां मी जोफच्या कानांत म्हणाले, "आतां पुन्हां वर जाते वेळीं तरी तो गप्प राहील अशी आशा करूं या."

आम्ही वर निघालों आणि किंचित्काळांतच जोफला, मला, विमानाच्या एका इंजिनाशीं धुराचे छोटे लोट पंख्यागत फिरतांना दिसले.

चमकून जोफला मी विचारलं, "तुला ते दिसताहेत का?"

त्यानें वैमानिकाला हटकून तिकडे त्याचं लक्ष वेधलं. वैमानिक ओरडला, " माय गॉड ! गॅसोलाइन ! "

विमानानं एक चमत्कारिक गिरकी घेतली. कसेबसे पण सुरक्षितपणें आम्ही 'वॅको'च्या विमानतळावर उतरलों आणि वैमानिकाच्या लक्षांत बिघाडाचं स्वरूप आलं.

शेपर्ड एअर बेसवर आम्ही उशीरांच पोंचलों. मोटारीनें निघालेला फ्रांझ रप् प्रवासाचा शीण घालवून ताजातवाना झालेला होता.

तळावर हजारों जण उपस्थित होते. उत्सुक होते. अशा ठिकाणची एक सोय अशी असे कीं, या श्रोत्यांसाठीं मुद्दाम कांहीं वेगळं गाण्याची आवश्यकता नसे. नेहमींचींच गीतं त्यांना आवडत.

कोरियांतला प्रसंग सांगते. कार्यक्रमानंतर दोघंजणं तरुण माझी स्वाक्षरी घ्यायला आले. ते घाईत दिसले. मी तसं बोललेही. तेव्हां त्यांतला एक हंसला. म्हणाला " आम्ही आघाडीवरून पळून या कार्यक्रमाला आलों आहोंत. कुणाच्या लक्षांत यायच्या आंत पुन्हां आघाडीवर पोंचायला हवं ! "

मला स्मरणारा आणखी एक विशेष कार्यक्रम दुसऱ्या महायुद्धाच्याच काळांतला, कॅलिफोर्नियाच्या गोद्यांतला, मजुरांपुढचा. एका नव्या जहाजाच्या नामकरणानिमित्त मला बोलावलं होतं. जहाजाला नांव देण्यांत आलं: बुकर टी. वॉशिंग्टन. मग मधल्या रजेंत माझं गाणं झालं. पहावं तिकडे त्या जहाजावर माणसंच माणसं दिसत होतीं. 'वन्समोअर'चे गजर चालले होते. रजेच्या वेळाबाहेर मी गायले असं आतां आठवतं.

सार्वजनिक स्वरूपांत वावरण्यामुळें कांहीं मानसन्मानही चालून आले आहेत. त्यांना हवी ती वास्तविक योग्यता माझ्या ठायीं नसूनही ते मला चिकटले आहेत. 'Alpha Kappa Alpha Sorority'चं सदस्यत्व हा असाच एक मान. गुणी तरुण मुलांना शैक्षणिक आणि इतर सोयी उपलब्ध करून देणं, कामं मिळवून देणं, हें या संस्थेचं कार्य. एकेकदां अगदीं अनोळखी गांवीं या संस्थेचे सदस्य माझ्यासाठीं फार गोष्टी खुषीनं करतात.

स्वीडन आणि फिन्लंडच्या सरकारांकडून मला पदकं मिळालीं आहेत. हॉवर्ड, टेम्पल, स्मिथ, कार्लाईल, मोराव्हिअन, डिकिन्सन, अशा विविध कॉलेजांनीं, विश्वविद्यालयांनीं मला सन्मानदर्शक पदव्या बहाल केल्या आहेत. शिवाय 'नॅशनल असोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेण्ट ऑफ कलर्ड पीपल' या संस्थेचं पदक. या पदकाचं महत्त्व आगळं आहे, कारण या संस्थेची मी गेलीं कित्येक वर्षं सदस्य असून तिच्या कार्याबाबत मला जिव्हाळा आहे. आणखीही कांहीं मानसन्मान माझ्या वांट्याला माझ्या भाग्यानें आले आहेत; त्यांचा उल्लेख इथें नाहीं म्हणून असं समजण्याचं कारण नाहीं कीं मला त्यांची कदर नाहीं. एकच कीं, तशी यादी देण्याचं हें ठिकाण नव्हे.

सर्वांत उच्च सन्मान मी मला मिळालेलं 'बॉक ॲवॉर्ड' हा मानते. १९२१ मध्यें एडवर्ड बॉक या फिलाडेल्फियाच्या एका नगरशेठीनीं हें पदक ठेवलं. दर साल तें फिलाडेल्फियाला ज्याचा अभिमान वाटावा अशा फिलाडेल्फियाच्या एका नागरिकाला देण्यांत येतं. या पदकाबरोबर १० हजार डॉलर्सची रक्कमही असते. हिचा विनीयोग मी 'मारिअन ॲण्डर्सन' शिष्यवृत्त्या सुरूं करण्यासाठीं केला. देशभर फिरल्यामुळें, गोड गळ्याचीं मुलं किती मोठ्या प्रमाणावर सर्वत्र असतात तें मला माहीत झालं होतं. आणि त्यांच्या गळ्याचं चीज व्हायचं असल्यास त्यांना आर्थिक सहाय्याची जरुरी किती तीव्रतेनं भासण्यासारखी आहे हें माझ्या स्वतःच्या अनुभवानं मला माहीत होतं. जाणकार परीक्षकांमार्फत मुलांमुलींच्या गाण्याच्या स्पर्धा घेऊन लायक मुलांमुलींना या शिष्यवृत्त्या देण्याची योजना मी अंमलांत आणली. या स्पर्धांना मी उपस्थित रहात नाहीं. शिष्यवृत्ति पटकावणाऱ्या अनेक स्पर्धकांचं गाणं मला ऐकायला मिळालेलं नाहीं.

गुणी माणसं शोधण्याला स्पर्धा हा उत्कृष्ट मार्ग होय, असं माझं मत नाहीं. स्पर्धांत प्रत्येकाच्या गुणांचा वास्तविक अंदाज येतोच असं नाहीं. कुणी मन थाऱ्यावर ठेवून थोडंच गाईल, तर कुणी गडबडून जाईल आणि बरंच येत असूनहि व्यवस्थित गाऊं शकणार नाहीं. हें सारं

खरं असूनही स्पर्धांची उपयुक्तता मला अनुभवानें पटली आहे. शिवाय या स्पर्धेत मला एक समाधान असं आहे कीं, हिच्यांत भाग घेण्या-साठीं, उत्तीर्ण होण्यासाठीं गायकांवर कुठलंही संगीतबाह्य बंधन नाहीं. कुणाही गायकाला इथं मनाई नाहीं. इथं भेदाभेद नाहींत.

स्पर्धेत उत्तीर्ण झालेल्यांची भेट गांठ नसल्यानं एकदां मी ती घ्यायचं ठरवलं आणि जागोजागच्या स्पर्धकांना आमच्या इथें जमविण्याची व्यवस्था केली. बहिणींच्या मदतीनं तें शक्यही झालं. खूप मुलं मुली जमलीं. मी पार्टी दिली. परंतु कुणालाही मी गायला लावलं नाहीं. मनांत असतं तर संगीताचा एक प्रचंड जलसा मी घडवून आणूं शकले असते.

• •

# पति आणि संसार

लग्नाआधींच कित्येक वर्षं मी आणि माझे पति ऑर्फिअस फिशर यांनीं ठरवलं होतं कीं आपलं घर मांडायचं तें शहराच्या गजब-जलेल्या आणि यांत्रिक जीवनाच्या भागांत नव्हे; अधिक निवांत जागीं. लॉंग आयलँड, न्यू जर्सी, कॉनेक्टिकट या भागांतून मग आम्ही घराचा शोध घेतला. कॉनेक्टिकटचा भाग आम्हांला अधिक पसंत पडला. त्या टापूंत बरींच घरं आम्हांला दाखवण्यांत आलीं आणि अखेर एक आम्ही पसंत केलं. घर कसं असावं त्याविषयींहि कांहीं तपशील मी मनाशीं निश्चित करून ठेवला होता. एक तर त्या घरानजीक मला एकादं तळं असायला हवं होतं. दुसरं म्हणजे त्या घराचं छप्पर खुजं असायला नको होतं, तें चांगलं उंच असणं अवश्य होतं. तिसरं असं कीं प्रत्येक मोठ्या खोलींत एक शेकोटी--फ्रायर प्लेस--असावी अशीहि माझी इच्छा होती. या घरांत यांतलं कांहींहि नव्हतं. ना जवळपास तळं, ना उंच छप्पर, ना महत्त्वाच्या खोल्यांत शेकोट्यांची व्यवस्था. सगळ्या घरांत एकाच ठिकाणीं शेकोटीची सोय होती. छप्पर विलक्षण खुजं होतं. शेतकी व्यवसायांतल्या कुणा माणसानं तें मागं केव्हां तरी बांधलेलं होतं. परंतु दुसरं घर उपलब्ध न झाल्यानं आम्ही हेंच घर खरीदलं. त्यांत मन रमण्यासारखं नव्हतंच. थोड्याच काळांत तें विकून जवळच दुसरं एक घर आम्ही विकत घेतलं. हें घर मात्र माझ्या अपेक्षा पुऱ्या करणारं होतं. जवळच्या एका झऱ्याला आडोसा घालून आम्ही एक सुंदरसा ,छोटाच पोहण्याचा तलाव तयार केला.

हें घर खरेदी केलं तेव्हां माझे पति–'किंग' या नांवानंच मी त्यांना संबोधते–न्युयॉर्कमध्यें त्यांच्या उद्योगांत व्यस्त होते. त्यांना आठवड्यांतला

सुट्टीचा एकुलता एक दिवस तेवढा त्या घरीं काढता येई. त्यांच्या मोकळ्या वेळांत त्यांनीं घरांत करून घ्यायच्या नवनवीन सोयी आंखल्या, त्यासाठीं माणसं नेमलीं आणि त्यांच्यावर देखरेख रहाण्याचीहि व्यवस्था केली. किमान बारा तास मला मोकळे मिळाले कीं मी न्युयॉर्कला जाई आणि आम्ही मिळून मग आमच्या घरीं जात असूं.

एक प्रसंग आठवतो. असेच आम्ही घरीं गेलों. मी आंत पाऊल टाकलं आणि पाहिलं तें असं कीं, वर जायचा जिना उखडून टाकला आहे. बरीच नासधूस झाली आहे. खूप केरकचरा पडला आहे. वर जायचं तर शिडीनं जावं लागणार होतं. तें सारं पाहून मी धसकलेच. 'किंग'ना मी म्हणाले, "काय हो हें? घराचं काय झालं हें!" त्यांनीं खूप सांगितलं, समजूत घातली, पण मला कांहीं पटत नव्हतं. माझे गांवोगांवचे कार्यक्रम चाललेच होते. मन अस्वस्थ होतं. घराचं काय होतं, काय नाहीं, याचेच विचार मनांत घोळत होते. अखेर एकदां अशीच मनांतली धाकधुक सावरीत घरीं आले आणि सर्व दुरुस्त्या करून झालेल्या होत्या. माझं घर खरोखर मोठं सुंदर झालं होतं.

नंतर बरेच दिवस आमचं घराच्या सजावटीचं काम चाललं होतं. किंग मला एकेक नमुने, फर्निचर कव्हर्सचे, वॉलपेपर्सचे, आपल्या अभिप्रायांसह टपालानें पाठवीत. मी त्यांवर माझं मत लिहून ते त्यांना परत धाडी. फर्निचरचा एकादा नमुना आवडला कीं लागलींच ते त्याचं छायाचित्र घेऊन तें मला पाठवीत. मी पसंत केला तर तो नमुना ते विकत घेत.

आमचा दोघांचा एकत्र असतांनाचा कांहीं कांहीं काळ फार चांगला गेला आहे. किंग मनानं समंजस आणि वृत्तीनें खेळकर आहेत; आणि असा जोडीदार मिळाला म्हणूनच माझा संसार यशस्वी झाला. एरवीं अद्यापही माझा फार काळ घरापासून दूर दूर जातो. त्यांनीं मात्र घरींच एका खोलींत आपली कचेरी थाटून आपला आर्किटेक्टचा व्यवसाय तिथंच चालता ठेवला आहे. जवळ जवळ वर्षभर ते घरींच, निदान घरापासून नजीक असतात. कधीं माझ्याबरोबर माझ्या एकाद्या दौऱ्यावर आले तरच घर सोडून लांब येतात. खुल्या हवेंत काम करणं त्यांना आवडतं. ते जात्या

हरकसबी आहेत. सुतारकाम त्यांना येतं, गवंडीकाम येतं, विजेचं काम येतं, गृहोपयोगी असं प्रत्येक कसब त्यांना अवगत आहे. बाहेर धंद्याचं काम नसतं तेव्हां ते घरांतच अशीं कांहीं कामं काढतात. या बाबतींत कुणाही गृहिणीला माझा हेवा वाटावा. आमच्या घराचं नवं स्वरूप 'यां'च्याच कल्पनेनुसार घडलं. किंबहुना अनेकदां हाताशीं लायक माणसं असतांनाही ते स्वतः कांहीं कांहीं कामं करीत. या दुरुस्तीसाठीं लागणारीं यांत्रिक उपकरणं त्यांनीं स्वतःच्या वर्कशॉपमधलीं आणलीं होतीं.

'गृहिणी' म्हणून माझ्या घरांत रहाण्याचा प्रयत्न मी नेहमीं करते; परंतु अद्यापपर्यंत हा 'पार्ट टाइम जॉब'च रहात आला आहे. एप्रिलच्या अखेरपर्यंत माझे दौरे संपतात. मग कुठं परदेशांत जायचं नसेल तर सलग दोन तीन महिने मी घरीं काढते. या काळांत वर्षांतल्या उरलेल्या काळाची भरपाई करण्याची माझी कोशिस चालते.

माणसांची ये जा आमच्या घरीं फार प्रमाणांत नसते; परंतु आमचे दोघांचेही कांहीं सारखे स्नेही आहेत, त्यांना, मी घरीं असले कीं आम्ही जेवायला, रहायला बोलावतों. सार्वजनिक संस्थांशींही आमचा फारसा संबंध नाहीं. आमच्या भागांतल्या व्हॉलण्टरी फायर डिपार्टमेंटचे किं हे सदस्य आहेत. मलाही आमच्या गांवांतल्या इतर बायकांप्रमाणें इस्पितळं, शाळा इत्यादि उपयुक्त स्थानिक संस्थांच्या कामांत वांटा उचलावासा वाटतो, परंतु तें शक्य होत नाहीं. कदाचित् पुढें मागें तें शक्य होईलही.

हस्तव्यवसायांची मला आवड आहे. श्रम मला आवडतात. असेच एका मुक्कामांत फर्निचरच्या दुरुस्तीच्या शिकाऊ प्रयत्नांत मी माझे दिवस मजेंत घालवले. नवनवीन गोष्टी शिकणं म्हणजे केवढी गंमत असते तें या काळांत मला समजलं. यासारखं बरंच कांहीं शिकावं, करावं असं मनांत फार आहे.

शिवणकाम मला आवडतं. रफू करण्यांत मी बऱ्यापैकीं वाकबगार आहे. बागकामाचीही मला आवड आहे. दौऱ्यावर असतांना नवनवीन बीबियाणं मिळवून मी तें घरीं आणते आणि आमच्या भागांत नवनवीन

प्रकारचीं झाडं लावण्याचा प्रयत्न करते. स्ट्रॉबेरीजची आवड तर मला खूप आहे. आमच्या बागेंत त्यांचा एक मोठा वाफा आहे; त्यांत कधींकधीं नेहमींपेक्षां मोठीं स्ट्रॉ–बेरीज होतात.

घर, स्वयंपाक या गोष्टींकडे लक्ष देण्यासाठीं आम्ही एक मुलगी ठेवली आहे. परंतु दर गुरुवारीं आणि एकाआड एक रविवारीं स्वयंपाकाचं काम मी माझ्या हातीं घेते. अशा वेळीं त्या कामांत मन खूप रमतं. आमची ती मुलगी कुठं गेलेली असली कीं 'यां'ची न्यहारी मी बनवते. अर्थात् अनेकदां माझी न्यहारी बनवून माझ्यापुढें ती ऐन बिछान्यांतच ठेवण्याइतकी तत्परता 'यां'नीं दाखविली आहे हें इथं नमूद केलं पाहिजे. मला विचारलं तर, हें मला आवडत नाहीं. मला सकाळीं लौकर उठून स्वतः कामांत गर्क होणंच आवडतं.

माझ्या पद्धतीनं मी स्वयंपाकाचे वेगवेगळे प्रयोग करून पहात असते. कधीं 'हे' आपलं डोकं चालवतात आणि आमच्या नोकराणीला आपल्या म्हणण्याप्रमाणं स्वयंपाक रांधण्याला सांगतात. गांवोगांव फिरतांना हॉटेलांचे 'मेनू' पाहून, अभ्यासून मी विटले असणार हें 'यां'ना कळतं. आणि म्हणून ते मला आपल्या कल्पनेनं मला आवडेल असं जेवण वाढलं जाण्याची व्यवस्था करतात. माझ्या दृष्टीनं, अशा वेळीं स्वस्थपणें जेवायला बसून पुढं येतील ते, मी न शोधलेले, न मागवलेले, उत्कृष्ट पदार्थ आस्वादिण्यांत एक आगळं सुख असतं. माझा अपेक्षाभंग सहसा होत नाहीं, कारण यांना वेगवेगळ्या पदार्थांची रुचि फार चांगली आहे. अनेक पदार्थांचं मिळून एक रुचकर जेवण बनविणं त्यांना चांगलं जमतं. एकेकदां आम्हांला अगदीं अनोळखी, नवा असा पदार्थ त्यांच्या डोक्यांत येतो. माझा स्वयंपाकाचा वार असला म्हणजे मला ते तो करायला सांगतात. अशा वेळीं मला अशा पदार्थांचीं प्रमाणं देणारीं पुस्तकं ( कुक बुक्स ) फार उपयोगीं पडतात.

तशी मी बरीच सुगरण असल्याचं अनेकजण सांगतील. 'प्लेन केक' बनविण्यांत माझा हातखंडा आहे. मी बनविलेलं 'चीज-सोफ्ल्' कित्येकदां जेवणाच्या टेबलावर ठेवलं जाईपर्यंत रचलं तसं टिकलं आहे.

माझे यजमान तसे मोठे खिलाडू वृत्तीचे आणि 'सोशिक' आहेत. मी करते ते सर्व पदार्थ ते चाखून पहायला तयार असतात. एकदां बोलता बोलता आमचा विषय निघाला कीं, सुगरणीनं स्वयंपाक करते वेळीं पुस्तकांवर विसंबता कामा नये. तिनं स्वतःच प्रयोग कां करूं नयेत ? त्या दिवशीं जेवणाला 'मीट लोफ' असणार होतं. स्वयंपाकाचा माझा वार होता. मी स्वतः पुस्तक न पहाता 'मीट लोफ' करायला घेतलं. अंदाजानं सारे पदार्थ टाकले. प्रमाणं माझीं मीच ठरवलीं. अखेर तयार होईल तें काय आणि कसं होणार हें माझं मलाच सांगता आलं नसतं. तयार झालं तें 'मीट लोफ' 'यां'ना वाढलं. आणि 'हे' तें चाखून म्हणाले, "छान ! उत्कृष्ट ! असं कधीं खाल्लं नाहीं. पुन्हा एकदां कधीं तरी कर."

मलाही बरं वाटलं.

पुन्हां 'मीट लोफ' बनविलं तेव्हां माझी मीच अस्वस्थ होते, काळीज धाकधुकत होतं. पहिल्या खेपेचा बेधडक आत्मविश्वास नव्हता. अखेर तयार झालं तें 'मीट लोफ' भयंकर असलं पाहिजे. कारण पुन्हा 'यां'नीं तें कर असा आग्रह चुकून सुद्धां केलेला नाहीं..

परंतु म्हणून मी खचलेली नाहीं. जाते तिथून मी नवनव्या पदार्थांच्या कल्पना आणते आणि घरीं त्या प्रत्यक्षांत उतरवून पहाते. स्वीडनमध्यें मी रानबदकाचा एक पदार्थ शिकले. घरीं तो मी चांगल्या तऱ्हेनें बनवला. फ्रांसमध्यें कालवांचा एक पदार्थ शिकले आणि घरीं तो 'यां'ना आवडला. एका चिनी मैत्रिणीनें मला कांहीं पदार्थ शिकवले आहेत ते मला चांगले जमतात.

आमच्या बागेंत भाजीपाला बराच होतो. आमची जरूर भागून तो उरतो, इतका होतो. फळफळावळही होते. कांहीं प्रमाणांत, फळं मुरवून आम्ही वर्षाच्या इतर दिवसांसाठीं तीं डब्यांत भरून ठेवतों; आणि मला तेवढा उत्साह असता तर जास्त प्रमाणांतही हें जमलं असतं. फळांना तोटा नाहीं.

घरकाम म्हणजे मला मजा वाटते. वर्षभर तेवढंच मला करावं लागलं असतं तर त्यांत मन घालून मी अधिक काम थोडक्यांत

करण्याच्या कितीतरी क्लृप्त्या काढल्या असत्या. केर काढणं मला अवघड वाटत नाहीं. घर धुणंही कठीण जात नाहीं. केरसुणी, फडकीं, साबणाच्या पाण्याच्या बालड्या, हें सारं मला परकं वाटत नाहीं. स्वच्छतेची मला जात्याच आवड आहे आणि माझं घर स्वच्छ, चकचकीत आणि टापटिपींत असलेलं पांहिलं कीं मला केवढं तरी सुख होतं. उसंत मिळाली कीं मी असल्या कामांत स्वतःला गुंतवून घेते.

संध्याकाळच्या वेळीं शेकोटीपाशीं निवांतपणें वेळ घालवणं आम्हां दोघांनाही फार आवडतं. कधीं कधीं आम्ही जोडीनं गातों. 'यां'ना आवाज आहे. माझ्याबरोबर ते मागें गातही असत. ओले स्पीक्सनं रचलेलं 'सिल्हिया' हें गीत तेव्हां त्यांचं हातखंडा होतं. टेलिव्हिजन त्यांना आवडतं. जेवल्यावर किंवा फिरून आल्यावर ते त्यांचं आवडतं कुत्रं पायापाशीं किंवा मांडीवर घेऊन एका आरामखुर्चीत मजेनें पसरतात आणि टेलिव्हिजनवरचे कार्यक्रम पहातात. मग त्यांचा डोळा लागतो. त्यांच्याबरोबर मीहि टेलिव्हिजन पहात असते; पण त झोंपल्यावर मला आतां त्यांत रस रहात नाहीं. मी बाहेर जाण्यासाठीं हळूंच उठते. आणि 'हे' नेमके जागे होऊन विचारतात, "चाललीस कुठें ?" म पुन्हा जागेवर बसून टेलिव्हिजन पहावं लागतं.

बेसबॉल मात्र मला आवडतो. विशेषतः 'ब्रुकलिन डॉजर्स' खेळत असतील तेव्हां मी टेलिव्हिजनवर तो सामना पहातांना बेभान असते. १९५५ सालीं या संघानं अंतिम सामना जिंकला तेव्हांचा खेळ पहातांनाचा माझा उत्साह एवढा होता कीं, कुणी त्रास देऊं नये म्हणून मी टेलिफोन हूकवरून खालीं काढून ठेवला होता. नंतर घरांतल्या कांहीं फर्निचरचीही किरकोळ दुरुस्ती करावी लागली.

लग्न केलं तेव्हां प्रपंचाच्या कांहीं कल्पना आम्ही केल्या होत्या. त्यांत मुलांना स्थान होतं. परंतु मग माझ्या कार्यक्रमांचा व्याप एवढा वाढला कीं आमचा तो बेत आम्हांला तात्पुरता तरी तहकूब ठेवावा लागला. आमचीं मुलं 'आया' कडे सोंपवणं आम्हांला आवडलं नसतं. तीं आमचीं आम्हांला वाढवायचीं होतीं. तसंच माझ्या मुलाला माझ्याबरोबर गांवोगांव फिरविण्याची कल्पनाही मला मानवत नाहीं. दिवसा-

दिवसागणिक माझे मुक्काम बदलणार. म्हणून त्यालाही तसंच थोडंच हिंडवायचं ?

इतरांचीं मुलं पहाते, तेव्हां घेतलेल्या निर्णयाचा विचार पडतो. मुलांशिवाय संसाराला शोभा नाहीं हें मला पटतं. प्रेमळ स्वभावाचे 'किंग' हे फार चांगले ' वडील ' शोभतील हेंही मला माहीत आहे. सुट्टींत मग आम्ही आमच्या नात्यांतलीं मुलं घरीं बोलावतों. घर कसं मग भरल्यासारखं वाटतं. माझा भाचा जिम लहान होता, तेव्हां तो आमच्या इथं रहायला आला कीं त्याचं सारं करतांना केवढं तरी सुख वाटायचं.

मुलांअभावी आम्ही कांहीं प्राणी पाळले आहेत, त्यांवरच आम्ही खूप माया करतों. गाण्याचा व्यवसाय संभाळून लेकुरवाळया होणाऱ्या मैत्रिणींचा मला नेहमींच हेवा वाटतो. वाटतं, मीच कच खाल्ली. नसते संशय चिकटवून घेतले. भीति चिकटवून घेतली. या साऱ्या करतात तें मलाहि साधलं असतं. पण मग असंहि वाटूं लागतं कीं, हे नियम सरसकट नव्हेत. कुणाला कांहीं साधतं तर कुणाला आणखी कांहीं. प्रवृत्तीगणिक कर्तृत्व बदलतं. माझ्या परिस्थितींत आहे हेंच ठीक असेल.

'यां'ना माझं मन समजतं.

● ●

८५०३

# ' मेट्रॉपॉलिटन '

१९५४ च्या सेप्टेंबरमध्यें शेक्सपिअरचं ' मिडसमर नाइट्स ड्रीम ' हें ' ओल्ड व्हिक'च्या कलाकारांनीं बसवलेलं नाटक मि. हुरोकनीं अमेरिकेला आणलं. न्युयॉर्कच्या मेट्रॉपॉलिटन ऑपेरा हाऊसमध्यें त्याचा पहिला प्रयोग होता. मोठ्या दूरदृष्टीनं मि. हुरोकनीं मला आणि माझ्या यजमानांना त्या उद्घाटनाच्या प्रयोगाला निमंत्रण दिलं. प्रयोगानंतर एक पार्टी मि. हुरोकनीं योजिली होती, तिलाही आम्हांला निमंत्रण होतं.

" त्यांनीं बोलावलं खरं;" मी 'यां'ना थिएटराबाहेर येतांच म्हणाले, " पण खूप बडीं बडीं माणसं जमणार. मिस्टर हुरोक यांचा वेळ त्यांतच जाईल. आपण आपले घरीं जाऊं या. "

न्युयॉर्कमध्येंच आम्ही एक छोटीशी जागा नेहमींसाठीं भाड्यानं घेतलेली आहे. कारण, अनेकदां या भागांत माझे कार्यक्रम होतात आणि मग घरीं जाणं त्रासाचं होतं.

' यां ' ना माझं म्हणणं पटलं.

" फार तर असं करूं," मी म्हणाले, " घरीं पोंचतांच तिथून मी हुरोकना फोन करीन. दिलगिरी व्यक्त करीन. "

आम्ही गाडींत चढलों होतों. 'यां' नीं गाडी सुरू केली. न्युयॉकमधल्या आमच्या जागेच्या दिशेनं आम्ही कांहीं अंतर काटलं आणि एकदम माझ्या मनांत कांहीं वेगळंच आलं. मी ' यां ' ना म्हणाले, " थांबा. आतां वाटतं कीं पार्टीला आपण जावं. नुसतं ' आलों ' एवढं नोंदवून लागलींच परत यावं. मला वाटतं, तेंच ठीक होईल. "

'यां'नीं मुकाट्यानें गाडी उलट दिशेला वळविली. वळवता वळवता ते म्हणाले, " लागलींच तरी आपण परत फिरलंच पाहिजे असं मला वाटत नाहीं. "

आम्ही पार्टीला गेलों. आमच्या माहितींतले कुणी भेटले. वेळ मजेंत चालला होता. मध्येंच केव्हां तरी मेट्रॉपॉलिटन ऑपेराचे जनरल मॅनेजर मि. रुडॉल्फ बिंग मला भेटले. त्यांनीं शिष्टाचारांत वेळ न घालवता मला बाजूला घेतलं आणि विचारलं,

" मेट्रोपॉलिटनमध्यें गाणं तुम्हांला आवडेल काय ?"

कांहींशा नवलानं मी त्यांच्याकडे पाहिलं. ते चेष्टा तर करीत नाहींत, असं वाटलं.

" इच्छा आहे का तुमची ?" त्यांनीं पुन्हां खोंचून विचारलं. मात्र त्यांच्या विचारण्यांत तांतडी नव्हती, घाई नव्हती, जणूं ते सहजीं भेट झाली म्हणून चौकशी करीत होते.

" मला वाटतं, मला तें आवडेल. " मी शक्य तवढ्या सहज सुरांत म्हणाले.

" खरं ?" त्यांनीं पुन्हां संथच सुरांत विचारलं.

" हो. खरं. "

" उद्यां सकाळीं फोन कराल ?" त्यांनीं विचारलं.

" हो. करीन. "

" एक मिनिट हं." ते म्हणाले. ' हे पहा मॅक्स रुडॉल्फ आले. " आणि त्यांच्या सहकाऱ्याशीं त्यांनीं माझा परिचय करून दिला. मि. रुडॉल्फ ' मेट्रॉपॉलिटन ऑपेरा'च्या कलावंतांचा विभाग पहात ते म्हणाले, " मिस्टर हुरोक तुम्हांला याबद्दल कांहीं म्हणाले नव्हते का ?"

मी म्हणाले, " तसा त्यांनीं एकदां सहज उल्लेख केला होता, पण तो फार अस्पष्ट आणि ओझरताच होता. "

" वर्षामागें आम्ही मिस्टर हुरोक यांच्याकडे तुमच्याबद्दल बोललो होतों. "

माझ्यासाठीं त्यांच्याकडे व्हर्डिच्या ' ए मास्क्ड् बॉल ' या संगीतिकेंत ' Ulrica ' या म्हाताऱ्या चेटकिणीची भूमिका होती.

" तुम्हांला तिची कल्पना आहे का ? " मि. रुडॉल्फनीं विचारलं.

" नाहीं. " मी म्हणाले. मला खरोखरच त्या भूमिकेची, त्या संगीतिकेची, किंबहुना कोणत्याच संगीतिकेची कल्पना असणं शक्य नव्हतं. त्या क्षेत्राचा विचारही कधीं मी केला नव्हता, त्यांत लक्ष घातलं नव्हतं.

नंतर बराच वेळपर्यंत आम्ही पार्टीला उपस्थित होतों. तिथें जेवताना मि. बिंग माझ्याबरोबर बसले आणि आम्ही बऱ्याच गोष्टी केल्या. मिस्टर हुरोक यांना भेटून मी थोडक्यांत सर्व सांगितलं. हेतु हा कीं, त्यांना कल्पना असावी.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मेट्रॉपॉलिटन ऑपेरातर्फे हुरोक यांच्या कचेरींत फोन आला. मला संगीतिकेंत काम करता यावं आणि त्यासाठीं तालमी घेतां याव्यात अशा हिशेबानं माझे गाण्याचे कार्यक्रम योजता येतील किंवा काय तें त्यांना हवं होतं. हुरोक यांच्या कचेरीकडून त्यांना 'हो'कार गेला. मग 'मेट्रॉपॉलिटन'च्या लोकांनीं ' मास्क्ड् बॉल'ची नोटेशन्स असलेली एक प्रत त्यांच्याकडे पाठवली, ती त्या लोकांनीं तात्काळ माझ्यापर्यंत पोंचती केली.

मला देऊं केलेली भूमिका मी अभ्यासली. माझ्या आवाजाशीं ती जमणार नाहीं असं माझं मला वाटलं. नकार देण्याची इच्छा झाली. परंतु ' प्रयत्न करीन ' असं अभिवचन मी दिलं होतं. कांहीं दिवस मी माझ्या भूमिकेचा अभ्यास केल्यावर डिमिट्री मित्रॉपाउलॉस या संगीत–नियोजकाकडून माझी ' टेस्ट ' घेण्यांत यावी आणि मग काय तें ठरावं असं ठरलेलं होतं. मित्रॉपाउलॉसशीं माझा व्यावसायिक परिचय ' न्युयॉर्क फिल्हार्मोनिक सिम्फनी ऑर्केस्ट्रा 'च्या निमित्तानें झाला होता; परंतु मधल्या बऱ्याच वर्षांत आम्ही कुठं एकत्र आलों नव्हतों.

आमची भेट घडतांच, 'टेस्ट'च्या वेळीं, मी त्यांना आधींच सांगून टाकलं, "माझ्या परीनें फार चढ आवाजाची ही भूमिका आहे. मला जमेलसं वाटत नाहीं."

ते म्हणाले, "सबंध गा तर खऱ्या. मग पाहूं."

मी ती गाऊन संपवली तेव्हां ते अत्यंत संथपणें म्हणाले, "अद्याप तुम्ही त्या भूमिकेवर पुरेसे श्रम घेतलेले नाहींत हें पहाता, ते घेतलेत कीं ती तुम्हांला जमेल."

माझं यानं समाधान झालं नाहीं. मी म्हणाले, "मग मला आणखी आठ दहा दिवस द्या. त्यानंतर पुन्हा येईन मी."

"ठीक." ते म्हणाले.

आतां आठ दहा दिवस सारं लांबणीवर पडलं, अशा कांहींशा निश्चिततेंत मी माझ्या रहात्या जागेकडे परतले. मध्यंतरी बरींच कामं करून घरीं येते तों फोन एकसारखा खणखणत होता. मी तो घाईनं उचलला.

फ्रांझ रप बोलूं लागला.

"अहो हुरोक तुम्हांला फोनवर गांठण्याचा केव्हांपासून प्रयत्न करीत आहेत. काम फार महत्त्वाचं आहे, म्हणतात."

मी लागलींच मि. हुरोकना फोन केला. त्यांनीं पहिला शब्द उच्चारला तोच, 'कॉंग्रॅच्युलेशन्स."

"कशाबद्दल?"

"आज दुपारीं मेट्रॉपॉलिटनमध्यें ठीक चार वाजतां आपण जाणार आहों—कॉंट्रॅक्टवर सही करण्यासाठीं. त्यासाठीं माझ्या ऑफिसांत या. मिळूनच जाऊं."

संगीतिकेच्या प्रयोगाचा दिवस उजाडला. ७ जानेवारी १९५५ हा तो दिवस. संध्याकाळीं थिएटरवर 'यां'नीं नेऊन सोडलं. तिथं जोफ आणि हुरोक यांच्या कचेरीचीं इतर माणसं माझी वाट पहात हजर होतीं. प्रयोगासाठीं मुद्दाम, माझीं घरचीं माणसं न्युयॉर्कला आलेलीं होतीं; माझ्याच जागेत

त्यांचा मुक्काम होता. प्रयोगाआधीं बराच वेळ तीं सारीं त्यांच्या 'बॉक्स' मध्यें येऊन बसलीं. प्रयोगांतले इतर नटनटी येऊन आपापल्या भाषेंत शुभेच्छा व्यक्त करून गेले. जोफ रंगमंचामागें धांवाधांव करीत होता. कपडेपटावरची बाई, रंगमंचावरचा प्रमुख, साऱ्यांना तो ओळखत होता आणि साऱ्यांकडे तो अशा पद्धतीनं बोलत होता, त्यांना सूचना करीत होता, कीं कुणाला वाटाव, हाच या संगीतिकेंत आपली पहिली भूमिका आज वठवणार आहे!

माझे कपडे घालून होतांच, आवाजाचा सराव करायला, आवाज 'तापवण्या'ला मला त्यानं बाजूला नेलं. इतर नटनटीही तें करीत होत्या त्यामुळें मला संकोच वाटला नाहीं. संकोच मुळीं उरलाच नव्हता. मग जोफ प्रेक्षागृहांत जाऊन त्याच्या जागीं बसला. पुन्हां माझ्या खोलीच्या दारावर कुणीतरी टक् टक् केलं. शब्द आले, " सुरुवात होते आहे. तुमचं काम अजून वीस मिनिटांनीं येईल. गुड लक्!"

...माझ्या प्रवेशावर पडदा वर गेला. नायिका यायची होती. मी माझं चेटकिणीचं रसायन बनवीत होते. अंगभर कंप सुटला होता. आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. तो संपेचना. गाण्यासाठीं मला तोंड उघडायलाच मिळेना. मी दगड बनते आहे, गोठते आहेसं वाटूं लागलं. गातांना मला मुळींच 'नर्व्हस' वाटत नाहीं असं एरवीं मी अभिमानानें सांगणारी, पण त्या रात्रीं मी नेहमींची उरले नव्हते. ही भूमिका चांगली झालीच पाहिजे, आजची रात्र सुरळीत पार पडलीच पाहिजे, अशी कमालीची उताविळी लागून राहिली होती. मी गायले. परंतु माझं मुळींच समाधान झालं नाहीं. आवाज असावा तसा नव्हता. दीर्घ अनुभवाचं पाठबळ असूनही त्या रात्रीं मी सैरभैर होऊन गायले. हेंच खरं कीं, माणसानं आपण कधींही घाबरणार नाहीं, 'नर्व्हस' होणार नाहीं, असली बढाई मारण्यांत अर्थ नाहीं. मनासारखं कांहींच जमत नव्हतं. आणि तें जमावं म्हणून शर्थ चालली होती. ती जाणवलीही असेल. त्या पहिल्या प्रयोगानंतर मी अतृप्त, अस्वस्थच राहिले.

परंतु श्रोते आणि माझे साथीदार नटनटी फार समजंस होते. त्यांनीं

तें सारं गोड मानलं. प्रयोगाच्या अखेरीला पडदा किंचित्काळासाठीं वर जाऊन आमचं एकत्रित दर्शन श्रोतृसमुदायाला घडायचं, तेव्हां बाजूच्या नट नटींनीं आपुलकीनें मुद्दाम मला पुढें ढकलून किंचित्काळ मला रंगमंचावर श्रोत्यांपुढें एकटं उभं केलं. वास्तविक हें 'मॅट्रॉपॉलिटन'च्या नियमाला धरून नव्हतं.

'मॅट्रॉपॉलिटन'ला मी पुन्हा त्यांच्या संगीतिकांतून हवी आहे हें नंतर ऐकून खूप बरं वाटलं. पुन्हा एकवार 'मेट्'च्या लोकांकडून हुरोक यांच्या कचेरींत फोन आला आणि 'बाईंना यासाठीं मोकळा वेळ मिळेल का' म्हणून पुन्हां विचारण्यांत आलं. हुरोक यांच्या कचेरींतल्या लोकांनाही थोडंसं आश्चर्य वाटल्याविना राहिलं नाहीं. त्यावर 'मेट्'चे फोन करणारे अधिकारी म्हणाले, " त्यांना एकदां काम दिलं, तें काय स्टंट म्हणून असं तुम्हांला वाटलं कीं काय? आम्हांला त्या कायम स्वरूपांत हव्या आहेत."

'मेट्रॉपॉलिटन ऑपेरा'ची सदस्य-कलाकार होण्याची संधि मला लाभली हें मला माझं भाग्य वाटलं. हा सन्मान केवळ माझाच नव्हे तर माझ्या बांधवांचाही होता. त्या 'ऑपेरा'मध्यें प्रवेश करणारी मी पहिली नीग्रो होते. त्या निमित्तानें जणूं माझ्या बांधवांना त्या लोकांनीं हेंच जाणवून दिलं कीं, "यानंतर ज्याची तपश्चर्या असेल त्याला कुठंही मुक्तद्वार मिळूं लागेल. हा नीग्रो, तो गोरा, हा भेदभाव मागें पडत जाईल." नीग्रो म्हणून आपला विचार सहानुभूतीनें व्हावा अशी आम्हां लोकांची इच्छा नव्हती आणि नाहीं. आमचं म्हणणं इतकंच कीं एक कलाकार, तंत्रज्ञ, किंवा साधा कामगार म्हणून आमचा विचार सर्वत्र निःपक्षपातीपणें व्हावा; आमच्या गुणांच्या किंमतीनें आम्हांला वागविण्यांत यावं. ही इच्छा भविष्यांत वाढत्या प्रमाणांत सफल होत जाईल याची खूण 'मेट्रॉपॉलिटन'च्या लोकांनीं दिली.

ज्या पद्धतशीर कौशल्यानें त्यांनीं मला आपल्यांत सामील करून घेतलं, आणि ज्या अपार मनःपूर्वतेनें जनतेनें त्या गोष्टीला आपला पाठिंबा दिला, तें कौशल्य, ती मनःपूर्वकता मी कदापि विसरणार नाहीं. त्याबद्दल

मी त्या सर्वांची ऋणी आहे. अशीं केवळ कांहीं स्वप्नं मी मनाशीं रेखाटलीं होतीं ; परन्तु तींच अशा प्रकारें खरीं झालीं.

पुष्कळ बाबतींत मी खरोखर भाग्यवान आहे, नशीबवान आहे. अमेरिकेंत कांहीं अतिशय महत्त्वाचे बदल होण्याच्या काळांत मी जन्मले, वाढले. मी ते बदल प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले. अजूनहि हें व्यापक स्थित्यंतर पूर्ण झालेलं नाहीं. आणि तेंहि मी पहाणार आहे. हे बदल सर्वांच्याच हिताचे ठरले आहेत आणि ठरतील.

१९३५ मध्यें, इथल्या उपलब्ध नीग्रो साथीदाराऐवजीं माझ्या युरोपीय साथीदारासमवेतच गात रहायचं मी ठरवलं तेव्हा माझं मलाहि तें कठीण वाटलं. परंतु हा निर्णय विशुद्ध कलात्मक पातळीवरून, केवळ संगीतांतल्या कारणांनीं घेतलेला होता. कुणाकुणाला वाटलं, मी माझ्या नीग्रो बांधवांकडे दुर्लक्ष करूं लागले आहे, पाठ फिरवली आहे. परंतु तसं कांहींच नव्हतं. कुणाला असंही वाटलं कीं माझ्या नव्या मॅनेजरच्या दडपणानं मी हा निर्णय घेतला. तेंही सत्याला धरून नव्हतं. मिस्टर हुरोकनीं व्यवहार सोडून माझ्या इतर कुठल्याही बाबतींत कसलीहि ढवळाढवळ कधींही केलेली नाहीं.

याचा इतका उल्लेख एवढयासाठींच कीं, यांतून एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. संधि आली असता माझ्या एकाद्या नीग्रो बांधवाला हात देणं मी टाळता नये, ही माझ्या लोकांची अपेक्षा तशी रास्तच होती. परंतु तसंच हेंही खरं कीं तसा हात मी द्यावा म्हणून त्या नीग्रो कलाकारानं इतर कलाकारांबरोबरच्या अटीतटीच्या स्पर्धेत उतरून आपली योग्यता रोखठोक सिद्ध केली पाहिजे होती. याबरोबर हें अर्थातच नमूद केलं पाहिजे कीं, अशा स्पर्धेसाठीं तपश्चर्या करण्याला उत्तेजन म्हणून अशा नीग्रो बांधवांना चांगल्या आणि निःपक्षपाती संधीची हमीही मिळाली पाहिजे. एरवीं तपश्चर्या कोण कशासाठीं करणार ?

न्याय्य वाटेल तें करण्याला कुणाचीच ना नाहीं. पण माणसं कचरतात; आधीं दुसरा कुणी पुढें होईल म्हणून वाट पहातात. दुसराही असाच, तिसरा कुणी प्रथम पुढें होईल म्हणून थांबतो. शब्दाला